बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९७४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक २० | बुधवार, दि.२४ एप्रिल २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

गोलू तिवारी हत्याप्रकरण;७ आरोपींना अटक

१२ वर्षापुर्वीच्या हत्येचा बदला

गोंदिया– शहरातील रामनगर पोलीस ठाणे अंतर्गत येत असलेल्या कुडवा नाकास्थित जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या समोरील फुटपाथवरील सायकल दुकानाजवळ सोमवारच्या रात्री ८.३० वाजेच्या सुमारास जुन्या वैमन्यासातून व आर्थिक देवाणघेवाणाच्या वादातून वाळू व्यवसायिक गोलू उर्फ रोहीत तिवारी याच्यावर गोळीबार करण्यात आल्याची घटना घडली.या घटनेत गोलू तिवारीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून पोलिसांनी अवघ्या काही तासात आरोपींना जेरबंद केले असून २९ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आल्याची माहिती पत्रपरिषदेत उपविभागीय पोलीस अधिकारी रोहीणी बानकर यांनी दिली.

आरोपीमध्ये मोहीत मराठे(शास्त्री वार्ड ३२),राजेंद्र दावणे(वय ३५),हिरो शंकर दावणे वय ४२,रा.दसखोली), शिवानंद ऊर्फ सुजल भेलावे १९,रितेश खोब्रागडे(वय २३)गोंदिया,विनायक नेवारे (वय २१,गिरोला/पांढराबोडी) व सतिश सेन रा.पन्नागार जबलपूर मध्यप्रदेश यांचा समावेश आहे. आरोपीवंर भादंवीचे कलम ३०२,३४,३/२५ आर्म एक्ट,सहकलम १३५,३७/१,१४३,१४४,१४८,१४९ मुंबई पोलीस कायद्यातंर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हत्याकांडात वापरण्यात आलेले बंदुक व वाहन जप्त करण्यात आलेले नव्हते.

आरोपींनी दोन दुचाकीवर चौघेजण जाऊन गोलवर एक राऊंड चालवला.तो गोलूच्या पाठीमागील डाव्याबाजूच्या भागाला लागल्याने आपला जीव वाचविण्याकरीता गोलू आपल्या दुचाकीने घराकडील रुग्णालयाकडे निघाला.परंतु शालीमार हॉटेलसमोरील वळणरस्त्यावर त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने खाली पडल्याने त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.त्यामुळे तिथे उपस्थितांनी त्याला अवंती चौकातील रुग्णालयात हलविले.

रुग्णालयातील डॉक्टरांनी सुध्दा गोलूच्या डोक्याला गंभीर दुखापत दिसल्याने व त्यांना गोळी लागल्याचे कुठेच दिसून न आल्याने डोक्याच्या उपचार करीत असतानाच त्याचा मृत्यू झाला.झालेल्या गोळीबाराने पुन्हा शहरात गँगवार सुरु झाल्याचे बघावयास मिळाले.यात गोलु उर्फ रोहीत तिवारी याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेत आरोपींना पकडण्याकरीता पथके गठित करुन अवघ्या काही तासात ७ आरोपींना ताब्यात घेत त्याना न्यायालयात हजर करण्यात आल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी वंदना बानकर यांनी पत्रपरिषदेत दिली.यावेळी रामनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संदेश केंजळे उपस्थित होते.पुढील तपास रामनगर पोलीस ठाण्याचे एपीआय बस्तवडे हे करीत आहेत.

सविस्तर असे की, शहरात वाळू व्यवसायाशी संबंधित रोहीत ऊर्फ गोलू हरिप्रसाद तिवारी हा आपल्या दुचाकी वाहन क्रमांक एमएच ३५,एव्ही ७९७९ ने आपल्या हनुमानगर घराकडे येत असतांना जिल्हा बँकेसमोर दोन मोटारसायकवर आलेल्या आरोपींनी गोलू याच्यावर मागून गोळीबार केला.यात गोलू तिवारीच्या पाठीला गोळी लागल्याने त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने तो खाली पडला.यात त्याच्या डोक्याला जबर मार लागल्याने परिसरातील नागरिकांनी त्याला अवंती चौकातील सहयोग रुग्णालयात दाखल केले.दरम्यान या घटनेची माहिती शहरात पसरताच वाळू व्यवसायाशी संबधित सर्वांनीच अवंती चौकातील सहयोग रुग्णालयात धाव घेतली. रुग्णालयात उपचार सुरु असतानाच गोलु तिवारी यांचा मृत्यू झाल्याचे कळताच त्यांच्या मित्रमंडळीनी रुग्णालयाच्या साहित्याची तोडफ ोड करुन मोठ्याप्रमाणात नुकसान केले.त्यानंतर पोलीस पोचताच सर्वांना बाहेर काढण्यात आले.

१२ वर्षापुर्वीच्या भावाच्या हत्येचा बदला

गोंदिया शहरातील शक्ती चौकात (शासकीय विश्रामगृहाजवळील) जमिनीच्या देवाणघेवाणाच्या वादातून ९ ऑक्टोंबर २०१२ रोजी श्रीराम सेनेचे जिल्हाध्यक्ष धरम दावणे यांची देशीकट्याचे दोन राऊंड फायर करुन व तलवारीने वार करुन हत्या करण्यात आली होती.या हत्याप्रकरणात मृतक गोलू तिवारी यांच्यासह इतर आरोपींचा समावेश होता.त्याप्रकरणाला घेऊनच नियोजनबध्दरित्या गोलुवर गोळीबार करुन हत्या करण्यात आल्याचे मृतकाचा भाऊ राहुल तिवारी याचे म्हणने आहे.घटनेच्या २ वर्षापुर्वी दोघांना गोलुकडे पाठविण्यात आले होते.त्यानंतर त्यांच्यासोबत हातमिळवणी केल्यानंतर ते तुरुंगात गेले.तुरुगांत गेल्यानंतर त्याच गँगच्या युवकांना हाताशी धरुन या घटनेला अंजाम दिल्याचे मृतकाच्या भावाचे म्हणने आहे.

स्थानिक गुन्हे शाखा व राम नगर पोलिसांना घटनास्थळावरुन एका गोळीचा काडतूस कॅप मिळाल्याने या घटनेत एकापेक्षा अधिक बंदुकीचा वापर झाल्याची शंका व्यक्त केली जात आहे.याची सोमवारी रात्री गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याची घटना घडली. शहरात व्यावसायिक गुन्हेगारांचे अड्डे झपाट्याने वाढत चालले असून, येथे व्यवसायाच्या निमित्तानं संघटित पद्धतीने रक्तपात केला जात आहे. गेल्या काही वर्षात अशी अनेक प्रकरणे उघडकीस आली असून, यामध्ये व्यावसायिकांनी एकमेकांना स्पर्धेत पराभूत करण्यासाठी वेगवेगळे डावपेच अवलंबले आहेत.

निवडणूक प्रक्रियेतून भारताचे राष्ट्रीय प्रतीक राजचिन्ह बदलले!

निवडणूक आयोगाचा अफलातून कारनामा; 'एम' नावाचे चिन्ह आणले उपयोगात



राष्ट्रीय प्रतिकाऐवजी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मतदान केंद्र अधिकाऱ्याला एम लिहिलेले देण्यात आलेला शिक्का.

गोंदिया:– भारतीय निवडणूक आयोगाच्या निवडणूक प्रक्रियेत याआधी भारताचे राष्ट्रीय प्रतीक असलेले ३ सिंहाच्या प्रतिमा दर्शवणारे राजचिन्हाचा वापर केला जात होता. मात्र यावेळी झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या प्रक्रियेतून चक्क सदर राजचिन्हाला निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रियेतून हद्दपार केले असून त्या जागी इंग्रजीत **'एम'** शब्द लिहिले असलेल्या चिन्हाचा वापर करण्यात आले असल्याचा अफलातून कारनामा उघडकीस आला आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या या निर्णयावर अनेक शंकाकुशंका निर्माण होत आहेत.

भारतात लोकसभा निवडणुकीला सुरुवात झालेली असुन प्रथम टप्पा १९ एप्रिल रोजी पार पडले असून निकाल ४ जून रोजी लागणार आहे. संपूर्ण लोकसभा निवडणूक यशस्वीरीत्या पार पडण्याची जबाबदारी ही निवडणूक आयोगाची असते. निवडणूक आयोगाची निर्मिती घटनात्मक असून ती स्वतंत्र यंत्रणा असते. भारत स्वतंत्र झाल्यापासून भारताचे राष्ट्रीय प्रतीक म्हणून सिंहाच्या प्रतिमा दर्शवणारी राजचिन्हाचा डिसेंबर १९४७ रोजी स्वीकार करण्यात आले. या राजचिन्हाचा उपयोग केंद्र शासन, अनेक राज्य सरकार तसेच शासकीय संस्थांद्वारे केला जातो. भारतीय निवडणूक आयोगाच्या वतीने निवडणूक प्रक्रिया पार पाडताना याआधी या चिन्हाचा वापर केला जात होता. निवडणूक आयोगाच्या वतीने निवडणूक पार पडल्यानंतर मतदान केंद्रांवरील साहित्य संकलित करून ते 'सिल' करण्यात येते.

'सिल' करतेवेळी जो शिक्का लावायचे त्यावर राज चिन्हाचा वापर केला जात होता. वर्षांनुवर्षे हीच परंपरा कायम होती. मात्र प्रथम टप्प्यातील मतदान १९ एप्रिल रोजी पार पडले. यावेळी झालेल्या निवडणूक प्रक्रियेत साहित्य 'सिल' करतेवेळी राजचिन्हाचा वापर थांबविण्यात आला असून त्याजागी इंग्रजीतील **'एम'** या शब्दाचा वापर करण्यात करण्यात आले असल्याचे निदर्शनास आलेले आहे. निवडणूक रिटर्निंग अधिकाऱ्याला देण्यात आलेल्या शिक्क्यावर राजचिन्ह ऐवजी इंग्रजीत एम शब्द लिहिलेल्या चिन्हाचा वापर करण्यात आल्याने निवडणूक आयोगाने राज चिन्ह का बदलले असा प्रश्न निर्माण झालेला आहे. विशेष म्हणजे इंग्रजीतील **'एम'** शब्द कशाचे प्रतीक आहे? कुणाचे नाव आहे की आडनावाचे सूचक चिन्ह? असे एक ना अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. निवडणूक प्रक्रियेतून चक्क राज चिन्हाचा वापर निवडणूक आयोगाने कुणालाही न सांगता कसे काय बदलले? त्यामुळे निवडणूक आयोगाच्या या अफलातून निर्णयावर अनेक शंकाकुशंका निर्माण होत असून यावर निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण देण्याची मागणी होत आहे.

ओबीसी वसतिगृहाला साहित्यपुरवठा नाहीच

गोंदिया : ओबीसी विद्यार्थ्यांच्या वसतिगृह प्रवेशाची प्रक्रिया प्रशासकीय स्तरावरुन सुरू झाली. मात्र शहरातील गणेशनगर आणि कुडवा येथे भाड्याने इमारती घेण्यात आल्या. मात्र, शासनाने अद्याप साहित्यपुरवठाच न केल्याने ओबीसी विद्यार्थ्यांचा वसतिगृह प्रवेश लांबणीवर पडला आहे.

ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी समाज शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आहे. वसतिगृहाची सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांना शहरात उच्च शिक्षणासाठी भाड्याने खोली घेऊन राहावे लागते. यात आर्थिक फटका सहन करावा लागतो. परिणामी, उच्च शिक्षणाची आवड असतानाही गरीबांची मुले शिक्षणापासून वंचित राहत आहेत. तथापि, विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी ओबीसी संघटनांनी सामाजिक न्याय विभागाप्रमाणे ओबीसी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहांचा आग्रह धरला. याची दखल घेत २०२२ च्या हिवाळी अधिवेशनात राज्यातील सर्व जिल्ह्यांत मुला-मुलींसाठी प्रत्येकी शंभर विद्यार्थी क्षमतेचे दोन वसतिगृह सुरू करण्याची घोषणा सरकारने केली. भाड्याने इमारती घेऊन वसतिगृह सुरू करायचे असल्याने ८ मे २०२३ पर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले. या प्रस्तावांना मान्यता मिळण्यात दिरंगाई झाली. नंतर २०२३ मध्ये पावसाळी अधिवेशनात ओबीसी कल्याणमंत्री अतुल सावे यांनी १५ ऑगस्टपर्यंत वसतिगृह सुरू होतील, असे आश्वासन दिले होते. नंतर नागपुरातील हिवाळी अधिवेशनात १८ डिसेंबर २०२३ ला महिनाभरात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली होती. मात्र, 'तारीख पे तारीख' देऊन सरकार वसतिगृहाचा मुद्दा रेंगाळत ठेवत होते.

सातत्याने ओबीसी संघटना व प्रसारमाध्यमांनी लक्ष वेधल्यानंतर ओबीसी कल्याण विभागाने पत्र काढून ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेशाकरिता ऑफलाइन अर्ज मागविले. ५ मार्चपर्यंत अर्ज सादर करण्यासाठी मुदत दिली होती. त्यानुसार, प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली. प्रवेशासाठी लागणारी प्रक्रिया सुरू केली.

शहराच्या गणेशनगर येथे मुलींसाठी, तर कुडवा येथे मुलांसाठी भाड्याने इमारती घेतल्या. परंतु, या इमारती केवळ देखावा ठरल्या आहेत. शासनाने अद्याप साहित्यपुरवठा केला नाही. हा पुरवठा केव्हा होईल आणि इमारती विद्यार्थ्यांना राहण्यायोग्य केव्हा होतील, हे यंत्रणेला अद्याप ठाऊक नाही. सोबतच वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व्हॅलीडीटीची अट ठेवण्यात आली आहे. हा अथडळा अजूनही कायम आहे. तथापि, वसतिगृह प्रवेशासाठी मुलींचे ४७, तर मुलांचे जवळपास ३२ अर्ज प्राप्त झाले होते.हे अर्ज कार्यालयातील कपाटात ठेवण्यापुरते मर्यादीत राहिले असून राज्यसरकार फक्त ओबीसींच्या योजनांची घोषणाबाजी करुन श्रेयवादाचे राजकारण करतांना दिसून येत आहे.

धान विक्रीसाठी ३० एप्रिल पर्यंत ऑनलाईन नोंदणी करावी

गोंदिया: शासकीय आधारभूत किंमत खरेदी योजने अंतर्गत रब्बी पणन हंगाम २०२३-२४ मधील धान खरेदीकरीता छएचङ पोर्टलवर शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी ३० एप्रिल २०२४ पर्यंत करावयाची आहे. शेतकऱ्यांनी नोंदणी करतांना प्रत्यक्ष लाईव्ह फफोटो अपलोड करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. शेतकरी नोंदणी करतांना हंगाम २०२३-२४ पासून ज्या शेतकऱ्यांचा सातबारा उतारा आहे त्याच शेतकऱ्यांचा प्रत्यक्ष लाईव्ह फफोटो अपलोड करणे आवश्यक आहे, त्याशिवाय नोंदणी पूर्ण होणार नाही. ज्या शेतकऱ्यांना शेतमालाची विक्री करावयाची आहे, त्याच शेतकऱ्यांनी लाईव्ह फफोटो अपलोड करण्यासाठी स्वत: खरेदी केंद्रावर उपस्थित राहून दिलेल्या कालावधीत म्हणजेच ३० एप्रिल २०२४ पर्यंत खरेदी केंद्रावर मुदतीत धान विक्रीसाठी नोंदणी पूर्ण करावी.

शेतकऱ्यांनी आधारभूत धान खरेदी केंद्रावर रब्बी पणन हंगाम २०२३-२४ मधील सातबारा उतारा, पीक पेरा असलेला, आधार कार्ड, बँक पासबुक, मोबाईल नंबर इत्यादी घेवून जावेत व विहीत मुदतीत नोंदणी करावी. बिगर आदिवासी क्षेत्रातील शेतकऱ्यांनीच मार्केटींग फफेडरेशनच्या खरेदी केंद्रावर ऑनलाईन नोंदणी करावे.

दीड लाखांचे बक्षीस असलेल्या नक्षल समर्थकास अटक

गडचिरोली : नक्षलवाद्यांच्या हिंसक घटनांमध्ये सक्रिय सहभाग असलेल्या एका नक्षल सहकाऱ्याला (जनमिलिशिया) गडचिरोली पोलिसांनी अटक केली. भामरागडच्या उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांनी भामरागड गावात फिफरताना त्याला अटक केली. दिलीप मोतीराम पेंदाम (३४ वर्ष) असे त्याचे नाव असून तो नेलगुंडा येथील रहिवासी आहे.

नेलगुंडाच्या जंगल परिसरात गेल्यावर्षी (दि.२२ मार्च २०२३) एक क्लेमोर व दोन कुकर बॉम्ब पेरून सुरक्षा दलाच्या जवानांना जीवे मारून त्यांची शस्त्रास्त्र व दारूगोळा लुटण्याच्या कटात तो सहभागी होता. त्याच्यावर शासनाने दीड लाखाचे बक्षीस ठेवले होते.

दिलीप पेंदाम याच्याविरूद्ध लाहेरी येथे भादंवि कलम ३०७, ३५३, ३४१, १४३, १४७, १४८, १४९, १२०(ब) भादंवि, सहकलम ४, ५ भारतीय स्फोटक कायद्याच्या वाढीव कलम १३, १६, १८, २०, २३, ३८, ३९ युएपीए ॲक्ट मध्ये त्याचा प्रत्यक्ष सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याला अटक करण्यात आली. अधिक तपासातात त्याने या आधीसुद्धा अनेक कारवायांमध्ये नक्षलवाद्यांना मदत, तसेच रेशन पुरवणे, गावातील लोकांना मिटींगसाठी जबरदस्तीने गोळा करणे, गैरकायद्याची मंडळी जमवुन पोलिसांविरुध्द कट रचने, नक्षल सप्ताहामध्ये बॅनर लावणे, पत्रके टाकणे अशी कामे तो करीत असल्याचे आढळून आले.

पोलिस दलाच्या या कारवाईमुळे जानेवारी २०२२ ते आतापर्यंत एकुण ७८ नक्षलवाद्यांना अटक करण्यात पोलिस दलास यश आले आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलिस अधीक्षक (अभियान) यतिश देशमुख, अपर पोलिस अधीक्षक (प्रशासन) कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अहेरी एम.रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली भामरागडचे उपविभागीय पोलिस अधिकारी अमर मोहिते यांच्या नेतृत्वात पार पडली. पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी नक्षलवाद्यांना हिंसक वाट सोडून आत्मसमर्पण करुन सन्मानाने जीवन जगण्याचे आवाहन केले आहे.

सहसंचालक डॉ.राधाकिशन पवार यांची आरोग्य संस्थाना भेटी

गोंदिया– क्षेत्रस्तरावर प्रत्यक्ष भेट देवुन किटकजन्य व जलजन्य आजार कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठी राज्यस्तरावरुन विदर्भातील आरोग्य संस्थाचा भेटीचा कार्यक्रम सहसंचालक डॉ.राधाकिशन पवार याच्या अध्यक्षेतीखाली सुरु झाला आहे. सदर समितीमाफर्फत विदर्भातील जिल्ह्यातील आरोग्य संस्थाना भेटी देवुन किटकजन्य,जलजन्य,कुष्ठरोग, क्षयरोग, साथरोग,माता व बाल संगोपन ई. विविध कार्यक्रमाचा आढावा घेण्यात येत आहे.सहसंचालक आरोग्य सेवा (हिवताप,हत्तीरोग व जलजन्यरोग) पुणे डॉ.राधाकिशन पवार यांनी गोंदियातील सडक अर्जुनी तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र खोडशिवनी व अर्जुनी मोरगाव तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र गोठणगाव येथे प्रत्यक्ष भेट देत आढावा घेतला.

२५ वर्षांपासून गोंदियात निरीक्षण व बालगृह सुधारगृहाची प्रतीक्षा

गोंदिया: बाल न्याय अधिनियमांतर्गत १८ वर्षाखालील विविध संघर्षग्रस्त, अनाथ व निराधार, हरवलेली, गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळलेली व काळजी संरक्षणाची गरज असलेल्या मुला-मुलींसाठी अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय सेवा, शिक्षण प्रशिक्षण उपलब्ध करुन देऊन त्यांचे समाजामध्ये पुनर्वसन करण्याकरिता निरीक्षणगृह व बालगृह ही योजना राबविली जाते. मात्र जिल्ह्याला २५ वर्षे झाली असली तरी गोंदियात निरीक्षण व बालगृह नाही. त्यामुळे गोंदियातील विधीसंघर्षित बालकांना नागपूरला न्यावे लागते.

सन २०२० मध्ये वर्धेतील निरीक्षण व बालगृह गोंदियात हलविण्यात येणार होते. परंतु मांजर कोठे आडवी गेली ते कळले नसून निरीक्षणगृह गोंदियात आलेच नाही. शासकीय बालगृहे बाल न्याय अधिनियम २००० व सुधारित अधिनियम २००६ च्या तरतुदीनुसार जपणूक व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार, निराश्रीत, संकटग्रस्त ० ते १८ वयापर्यंतच्या बालकांना बालकल्याण समितीच्या आदेशान्वये बालगृहात प्रवेश दिला जातो. या योजनेंतर्गत बालकांना संरक्षण, संगोपन, शिक्षण, प्रशिक्षण, वैद्यकीय सुविधा पुरवून पुवर्नसनासाठी प्रयत्न केला राज्यात स्वयंसेवी संस्थेमार्फत अनुदानित १००५ बालगृहे कार्यरत आहेत. त्यांची मान्य संख्या ८३ हजार ६८४ आहे. विनाअनुदानित ८१ बालगृहे कार्यरत आहेत. त्यांची मान्य संख्या ५०१० इतकी आहे. विशेष गृह बालगृहामधील १८ वर्षे पूर्ण झालेल्या मुला-मुलींचा वास्तव काल संपल्यानंतर संस्थेमधून बाहेर पडताना ज्या मुलांच्या पुनर्वसनाची योग्य व्यवस्था झालेली नाही, अशा मुलांना त्यांचे अपुरे राहिलेले शिक्षण, प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी तसेच नोकरी किंवा व्यवसाय मिळेपर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी अनुरक्षण गृहात प्रवेश दिला जातो. अनुरक्षण गृहात दाखल होणाऱ्या प्रवेशितांना अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय सेवा शिक्षण, प्रशिक्षण इतर सुविधा पुरविल्या जातात व त्यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न केले जातात. याकरिता या संस्थांना अनुदान दिले जाते. २० वर्षानंतर जिल्ह्यात निरीक्षणगृह छोट्या-मोठ्या गुन्ह्यात सहभागी असलेल्या विधीसंघर्षित बालकांचे पुनर्वसन करण्यासाठी जिल्हास्तरावर बाल निरीक्षणगृह असायला हवे. परंतु गोंदिया जिल्ह्याच्या निर्मितीला २० वर्षाचा कालावधी लोटूनही गोंदिया जिल्ह्यात विधीसंघर्षित बालकांसाठी निरीक्षणगृह नसल्याने व बालकांना भंडारा, नागपूर याठिकाणी हलवावे लागते.

२०१९ मध्ये जिल्ह्याला बालगृह व निरीक्षणगृह मंजूर

बालकांची काळजी आणि संरक्षण चाइल्ड केअर ॲन्ड प्रोटेक्शन (काळजी आणि संरक्षण) करण्यासाठी बालगृह सुरु करण्यात येत आहे. १८ वर्षाखालील बालकांच्या पुनर्वसनासाठी सन २०१९ मध्ये गोंदिया जिल्ह्याला बालगृह व निरीक्षणगृह मंजूर करण्यात आले. परंतु गोंदियात बालगृह व निरीक्षणगृह आतापर्यंत सुरु करण्यात आलेले नाही.

एवढे दिले जाते अनुदान

संस्थांचे वेतन, प्रवास, कार्यालयीन खर्च, साधन सामग्री, आहार हा खर्च पूर्णपणे शासन करते. स्वयंसेवी बालगृहांना महिन्याकाठी १५० रुपये प्रति महिना सहायक अनुदान दिले जाते. गतिमंद व दुर्धर आजार असलेल्या मुलांच्या बालगृहासाठी ११४० रुपये महिन्याकाठी दिले जातात.

समस्या,प्रलंबित प्रश्न परंतु मार्गी लावणार कोण?

गोंदिया: गोंदिया हे शहर जिल्ह्याचे केंद्र आहे. या शहरात रेल्वे जंक्शन, एसटीचे आगार, अग्निशामक पथक, अ श्रेणीची नगर पालिका याशिवाय जिल्ह्याची सर्वात मोठी बाजारपेठ आहे. असे असतानाही गोंदिया शहर एक नव्हे तर अनेक समस्यांचे माहेर घर होत चालले आहे. शहरातील अनेक प्रश्न प्रलंबित आहे. केरकचऱ्याचा प्रश्न आजही सतावत आहे. या प्रश्नांना वाचा फोडणारे कारभारी मात्र सुस्त आहे. त्यामुळे कारभाऱ्याचा झाला विकास, शहर मात्र भकास असे म्हणण्याची वेळ शहरवासियांपूढे आली आहे.

गोंदिया नगर पालिका सर्वात जुन्नी नगर पालिका आहे. या नगर पालिकेचा कारभार अनेक मोठ्या नेत्यांनी सांभाळलेला आहे. मात्र अद्यापही या शहराचा हवा तेवढा विकास झाला नाही. विकासाची कामेही कारभाऱ्याच्या मनमर्जीनेच होत आहे. त्यामुळे शहराचा विकास सर्वसामान्यांच्या जिव्हारी आला आहे. मोठे उड्डाणपुल बांधण्यात आले आहे. मात्र, त्या उडाणपुलाच्या निर्मितीचा आराखडाही कारभाऱ्याने आपल्या सोयीनुसार तयार केला आहे. त्यामुळे ते उडाणपुल वर्दळीसाठी अडचणीचे ठरू लागले आहे. भुमिगत गटार योजनेला पाच वर्षापूर्वी मंजूरी मिळाली.

मात्र अद्यापही पूर्णत्वास आली नाही. गटार योजनेच्या नावाखाली रस्त्यांची वाट लावण्यात आली आहे. ही योजना जरी भविष्यात शहरवासियांसाठी गटार पाण्याची समस्या मार्गी लावण्यासाठी असली तरी अनेक समस्यांना निर्माण करणारी ठरणार आहे. मागील पाच वर्षापासून घनकचरा व्यवस्थापनाचा सोक्षमोक्ष अद्याप पर्यंत लावण्यात आले नाही. कचऱ्याचे ढिगारे शहरातील प्रत्येक रस्त्यांवर पहावयास मिळत आहे. नाल्यांची सफाई केली जाते. मात्र निघालेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावली जात नाही.

नगर पालिकेच्या शिक्षण व आरोग्य विभाग नावापुरताच ठरू लागला आहे. नगर पालिकेच्या अनेक शाळा अखेरच्या घटका मेउजत आहे. तर नगर पालिकेचे सुतिकागृह बंद झाले आहेत. एवढेच नव्हे तर प्रभाग आरोग्य केंद्र फलकापुरतेच पहावयास मिळत आहे. ए

कंदरीत गोंदिया शहर समस्यांचे माहेरघर होत चालले आहे. वाढत्या समस्या, प्रलंबित प्रश्नामुळे विकासाची कल्पना तर दुरच शहराचा भकासपणा चर्चेत आला आहे. यामुळे "कारभाऱ्यांचा झाला विकास, शहर मात्र भकास' अशी प्रतिक्रिया सर्वसामान्यांकडून उमटू लागली आहे.

नंबर वन बनविण्याचे स्वप्न कारभाऱ्यांच्या यादीतून डिलीट

दहा वर्षापूर्वी गोंदिया शहराला नंबर वन बनविण्याचे स्वप्न दाखविण्यात आले. निवडणुकीच्या पार्श्वभूमिकवर आश्वासनेही देण्यात आले. मात्र, आश्वासनाच्या पूर्ततेत बांधकामा शिवाय कोणतेही विकास कामे केली गेली नाही. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, आपत्ती व्यवस्थापन, पाणीपुरवठा या मुलभूत प्रश्न व समस्यांकडे दुर्लक्ष करण्यता आले. आता तर गोंदिया शहराला नंबर वन बनविण्याच्या त्या आश्वासनाचे स्मरण करणेही टाळले जात आहे. त्यामुळे कारभाऱ्यांच्या स्मरणातून नंबर वनचे स्वप्न डिलीट झाले की काय? असा सवाल उपस्थित होत आहे.

संपादकीय

ईव्हीएमच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह

मतदान यंत्रांचा (ईव्हीएम) निवडणुकीतील वापर, व्हीव्हीपॅट यंत्रांमधील चिठ्ठ्यांची मोजणी हे सारे विषय पुन्हा एकदा वादग्रस्त ठरले आहेत. व्हीव्हीपॅटमधील सर्व चिठ्ठ्यांची मोजणी करण्याच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे. पहिल्या टप्प्यात १०२ मतदारसंघांमध्ये मतदान प्रक्रिया पार पडल्याने आता व्हीव्हीपॅटमधील १०० टक्के चिठ्ठ्यांची मोजणी करण्याची मागणी पूर्ण होणे या निवडणुकीत तरी कठीण दिसते. मतदान यंत्रांच्या सुरक्षेबाबत राजकीय पक्षांकडून आक्षेप घेतला जातो आणि यंत्रांमध्ये फ्फ़ेरफ्फ़ार केला जात असल्याचा आरोप होतो. निवडणूक आयोगाने हे सारे आक्षेप फ्फ़ेटाळून लावले आहेत. निवडणूक आयोगाच्या यंत्रांमध्ये अद्याप कोणीही फ्फ़ेरफ्फ़ार करू शकलेले नाही, असा आयोगाचा दावा असतो.

अमेरिकेत अजूनही राष्ट्राध्यक्षांची निवडणूक ही मतपत्रिकेद्वारेच होते. काही राज्यांमध्ये मतदान यंत्रे उपलब्ध करून दिली जातात. जर्मनीमध्ये मतदान यंत्रे ही सर्वोच्च न्यायालयाने घटनाबाह्य ठरविली आहेत. परिणामी पुन्हा मतपत्रिकांचा वापर सुरू झाला. शेजारील बांगलादेशात मतदान यंत्रांचा वापर सुरू झाला होता पण विरोधकांच्या आक्षेपानंतर अलीकडेच झालेल्या संसदेच्या निवडणुकीत पुन्हा एकदा मतपत्रिकांचा वापर झाला. युरोपमध्ये अनेक राष्ट्रांनी मतदान यंत्रे बाद करून पुन्हा मतपत्रिकांच्या आधारे मतदान प्रक्रिया सुरू केल्याचा युक्तिवाद ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी अलीकडेच सर्वोच्च न्यायालयात केला होता.

देशात ईव्हीएम वापर कधीपासून सुरू झाला?

१९७७ मध्ये निवडणूक आयोगाने पहिल्यांदा मतदान यंत्राद्वारे मतदानाची कल्पना मांडली होती. १९७९ मध्ये पहिल्यांदा मतदान यंत्र भारतात तयार करण्यात आले. १९८० मध्ये निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांना मतदान यंत्राचे प्रात्यक्षिक दाखविले होते. १९८२ मध्ये केरळमधील पारूर विधानसभा मतदारसंघात देशात पहिल्यांदा मतदान यंत्राचा निवडणुकीत वापर झाला होता. १९८३ मध्ये देशाच्या विविध राज्यांमधील विधानसभेच्या १० मतदारसंघांमधील पोटनिवडणुकीत मतदान यंत्रांचा वापर करण्यात आला होता.

लोकसभा निवडणुकीत वापर केव्हापासून?

देशात सरसकट मतदान यंत्रांचा वापर हा २००४ च्या लोकसभा निवडणुकीपासून झाला होता. १९८८ मध्ये लोकप्रतिनिधी कायद्यात ६१ (ए) या नवीन कलमाचा समावेश करण्यात आला. या कलमानुसार निवडणुकीत मतदान यंत्राचा वापर करण्यास मुभा देण्यात आली. १९९० मध्ये निवडणूक सुधारणा समिती आणि तांत्रिक समितीने मतदान यंत्रांचा वापर करण्याची शिफारस केली होती. १९९२ मध्ये मतदान यंत्रांचा वापर करण्यासाठी नियमात आवश्यक ते बदल करण्यात आले. १९९८ मध्ये निवडणुकांमध्ये मतदान यंत्रांचा वापर करण्याबाबत राजकीय पक्षांमध्ये सहमती झाली. १९९९ ते २००४ या काळात विविध राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत मतदान यंत्रांचा वापर झाला होता. लोकसभा निवडणुकीत सरसकट २००४, २००९, २०१४, २०१९ च्या निवडणुकांमध्ये वापर झाला आहे.

व्हीव्हीपॅट म्हणजे काय?

व्हीव्हीपॅट म्हणजे व्होटर व्हेरिफ्फ़ाईड पेपर ऑडिट ट्रेल. हे यंत्र मतदान यंत्राला जोडलेले असते. मतदाराने मतदान यंत्रावर कळ दाबल्यावर बाजूच्या बॉक्समध्ये कागदी चिठ्ठी पडते. यावर मतदाराने मत दिलेल्या उमेदवाराला प्रत्यक्ष मत मिळाले की नाही याची मतदाराला खात्री करता येते. फ्फ़क्त सात सेकंद ही कागदी चिठ्ठी बघता येते. त्यानंतर ही चिठ्ठी बाजूच्या बॉक्समध्ये पडते. प्रचलित नियमानुसार प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील पाच व्हीव्हीपॅटमधील चिठ्ठ्यांची मतदारयंत्रांत नोंद झालेल्या मतांशी पडताळणी करण्याची तरतूद आहे. म्हणजेच उदा. १११ क्रमांकाच्या मतदान यंत्रावर नोंद झालेली मते आणि व्हीव्हीपॅटमधील चिठ्ठ्यांवर दर्शविण्यात आलेली मते यांची पडताळणी केली जाते. फ्फ़क्त पाच यंत्रांची पडताळणी करण्याऐवजी १०० टक्के मतदान यंत्रांवर नोंद झालेल्या मतांची व्हीव्हीपॅटमधील चिठ्ठ्यांशी पडताळणी करावी, अशी सर्वोच्च न्यायालयात याचिका सध्या प्रलंबित आहे.

निवडणूक आयोगाने सर्व मतदान यंत्रे आणि व्हीव्हीपॅटमधील चिठ्ठ्यांची पडताळणी करण्यात येणाऱ्या तांत्रिक अडचणींकडे सर्वोच्च न्यायालयाचे लक्ष वेधले आहे. सर्वोच्च न्यायालयाने मतदान यंत्रे आणि व्हीव्हीपॅटच्या वापराबाबत अनुकूल मत नोंदविले आहे. व्हीव्हीपॅटचा वापर करण्याचा निर्णय २०१० मध्ये झाला होता. तेव्हा विरोधात असणाऱ्या भाजपने मतदान यंत्रांच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण केले होते. ऑगस्ट २०१३ मध्ये मतदान यंत्राबरोबर व्हीव्हीपॅटचा वापर करण्यासाठी नियमात बदल करण्यात आले. सप्टेंबर २०१३ मध्ये नागालॅण्डमधील एका विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीत व्हीव्हीपॅटचा पहिल्यांदा देशात वापर झाला होता. मार्च २०१७ मध्ये गोवा विधानसभा निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा सर्व मतदारसंघांमध्ये वापर करण्यात आला होता. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत देशात सर्वत्र या यंत्रणेचा वापर करण्यात आला होता.

आक्षेप काय आहे?

इंडिया या विरोधी आघाडीच्या नेत्यांनी मतदान यंत्रांच्या निष्पक्षपणाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मतदान यंत्रांमध्ये फ्फ़ेरफ्फ़ार होत असल्याची भीती व्यक्त केली आहे. मतदान यंत्रांबाबत असलेली संदिग्धता दूर करण्यासाठी मतदान यंत्रावर कळ दाबल्यावर व्हीव्हीपॅटमध्ये पडणारी चिठ्ठी ही मतदाराच्या हातात मिळावी. त्याने ती चिठ्ठी बाजूच्या मतपेटीत टाकावी.मतमोजणी करताना मतदान यंत्राबरोबरीनेच व्हीव्हीपॅटच्या चिठ्ठ्यांचीही मोजणी केली जावी.म्हणजे संशय राहणार नाही, असा काँग्रेसचा दावा आहे.काँग्रेस किंवा इंडिया आघाडीची १०० टक्के मोजणीची मागणी निवडणूक आयोगाने फेटाळून लावली आहे. मतदान यंत्रे ही पूर्णपणे सुरक्षित असून,गेल्या ४० वर्षांच्या वापरात कोणालाही निवडणूक आयोगाच्या मतदान यंत्रात फेरभार वा तांत्रिक बदल करता आलेला नाही, असा दावा निवडणूक आयोगाने केला आहे.मात्र सोशल मिडियावर येत असलेल्या गोष्टी व वकिलांनी केलेला दावा हा सुध्दा नाकारणे योग्य नाही.

स्वातंत्र्य चळवळ व ब्राह्मण

भारतीय संस्थानिकांच्या १८५७ च्या उठावानंतर भारताचा राज्यकारभार ब्रिटीश सरकारने ताब्यात घेतला. त्यासाठी भारत सरकार अधिनियम १८५८ जारी करण्यात आला. भारतीय समाजावरील ब्राह्मणांचा प्रभाव लक्षात घेऊन भारतीयांच्या धार्मिक श्रद्धा आणि रितीरिवाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करण्यात येणार नाही, असे आश्वासन या अधिनियमाद्वारे देण्यात आले. एकप्रकारे ब्राह्मणांना झुकते माप देण्याचे धोरण इंग्रजांनी स्वीकारले. ब्राह्मण समाज शिक्षित असल्यामुळे या परिस्थितीचा फायदा घेत त्यांनी प्रशासनात मोठ्या प्रमाणात शिरकाव केला. धार्मिक बाबीत हस्तक्षेप न करण्याच्या सरकारी धोरणामुळे मनुस्मृतीवर आधारीत जुलूमी कायद्यांचा आधार घेत समाजावर पुनःश्च वर्चस्व स्थापित करण्याचा प्रयत्न केला गेला. भारतीय परिषद कायदा १८६१ नुसार भारतात विधिमंडळे स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला. या पार्श्वभूमिवर शासन आणि प्रशासनात अधिक वाटा मिळावा या हेतुने २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबई येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना करण्यात आली. काँग्रेसच्या या पहिल्या अधिवेशनाला देशभरातील ७२ प्रतिनिधी उपस्थित होते, ज्यात बहुसंख्येने ब्राह्मणांचा समावेश होता. इंग्रज सरकारशी सहकार्य करुन शक्य तितके फायदे पदरात पाडून घ्यावे, असे काँग्रेसचे सुरुवातीचे धोरण होते.

काँग्रेसवर हिंदुत्ववादी जहालांचा प्रभाव

काँग्रेसमधील हिंदुत्ववादी जहाल गटाला ही भूमिका मान्य नव्हती. या गटाचे नेतृत्त्व बाळ गंगाधर टिळक करीत होते. त्यांनी जनजागृतीच्या नावाखाली १८९३ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सव सुरु करुन हिंदू जहाल मतवादी गटाचे प्रभुत्त्व स्थापन करण्याचा प्रयत्न केला. जुलै १८९५ मध्ये टिळकांनी गोपाळ कृष्ण गोखले व न्या. महादेव गोविंद रानडे या मवाळ नेत्यांना पुण्याच्या सार्वजनिक सभेतून बाजुला सारले. काँग्रेसमधील या घडामोडींमुळे इंग्रजही सावध झाले. जहालांची ही हिंदुत्ववादी कृती काँग्रेसमधील मुसलमानांना देखील आवडली नाही. भविष्यातील सत्तेवर हिंदुत्ववादी गटाची विशेषतः ब्राह्मणांची एकाधिकारशाही स्थापित होईल, अशी भिती त्यांना वाटत होती. त्यातच ७ ऑगस्ट १९०५ रोजी बंगालच्या फाळणीची घोषणा झाल्यामुळे मुसलमान समुदायात प्रचंड असंतोष पसरला. या घडामोडींच्या पार्श्वभूमिवर मुसलमानांच्या हक्कांसाठी आवाज उठविणारी संघटना म्हणून ३० डिसेंबर १९०६ रोजी ढाका येथे नबाब सलीमुल्लाह यांच्या अध्यक्षतेखाली मुस्लीम लीग ची स्थापना झाली. आगामी सत्तेत एक वाटेकरी निर्माण झाल्यामुळे काँग्रेसमधील जहाल ब्राह्मणही सावध झाले. येथूनच काँग्रेसमधील मुसलमान आणि जहाल हिंदुत्ववादी यांच्यात परस्पर अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले. काँग्रेसमधील जहाल व मवाळ गटाचे मतभेद एवढे विकोपाला गेले की १९०७ च्या सुरत अधिवेशनात टिळकांच्या नेतृत्वाखालील जहाल गटाने काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली. काँग्रेसमधून बाहेर पडल्यावर टिळकांनी देशभर दौरे करुन लोकांना आपल्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना फारसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे काँग्रेसवर प्रभुत्त्व मिळविण्याचे त्यांचे स्वप्न भंग पावले. त्यामुळे ते जास्तच बिथरले.

प्रचंड निराशेपोटी आक्रमक होऊन टिळक केसरी वृत्तपत्रातून इंग्रजांविरुद्ध अतिशय जहाल लिखाण करु लागले. कारण त्यांचा असा समज झाला की सरकार मवाळ गटाच्या बाजूने झुकलेले आहे. टिळक यांच्या आक्रमक लिखाणामुळे इंग्रजांनी १९०८ मध्ये त्यांना अटक केली आणि सहा वर्षाच्या कारावासाची शिक्षा फर्मावत मंडालेच्या तुरुंगात डांबले. जहाल ब्राह्मण गटाला हा मोठा झटका होता. मुस्लीम लीगच्या स्थापनेपासून इंग्रजानी मुसलमानांना सहकार्य करण्याचे धोरण अवलंबले. या धोरणाचा एक भाग म्हणून १९०९ च्या कौंसिल कायद्यान्वये विधिमंडळात मुसलमानांसाठी जागा राखीव ठेवण्यात आल्या. इंग्रजांची ही कृती काँग्रेसबाहेर पडलेल्या जहाल ब्राह्मण नेत्यांना आवडली नाही. आपण काँग्रेस प्रवाहाबाहेर राहिलो तर सत्तेच्या वर्तुळापासून दूर फेकले जाऊ असा मुत्सद्दी विचार करुन ते परत काँग्रेसच्या बाजूने झुकू लागले. दरम्यान १९१४ मध्ये टिळकांची तुरुंगातून सुटका झाली. त्यांनीही अतिशय धोरणीपणा दाखवत काँग्रेसमधील मवाळांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न केला. त्यातच १९ फ्फ़ेब्रुवारी १९१५ रोजी गोपाळकृष्ण गोखले आणि ५ नोव्हेंबर १९१५ ला फिरोजशाहा मेहता या प्रभावशाली नेत्यांचे निधन झाले. त्यामुळे काँग्रेसमध्ये सक्रिय होण्याचा टिळकांचा पर्यायाने जहाल ब्राह्मण गटाचा मार्ग सुकर झाला. विशिष्ट डावपेचाचा भाग म्हणून त्यांनी जहाल भूमिकेत हेतूतः बदल करण्याचा देखावा निर्माण केला. त्यांच्याच पुढाकाराने मुस्लीम लीग व काँग्रेस यांच्यात १९१६ साली लखनऊ करार झाला. या करारानुसार मुसलमानांच्या विधिमंडळातील प्रतिनिधित्वाच्या मागणीला काँग्रेसने मान्यता दिली. जहाल ब्राह्मण नेत्यांना हे रुचले नसले तरी सद्यस्थितीत चूप राहणे त्यांनी पसंत केले.

काँग्रेस आणि ब्राह्मणेतर

अशातच २० ऑगस्ट १९१७ रोजी भारत मंत्री एडवीन एस. मॉंटेग्यू यांनी भारतीयांना क्रमवार स्वातंत्र्य आणि जनतेला उत्तरदायी सरकार स्थापन करण्याची घोषणा केली. त्यानुसार १९१९ चा भारत सरकार कायदा अस्तित्वात येऊन केंद्रिय स्तरावर द्विगृही व प्रत्येक प्रांतात विधिमंडळाची निर्मिती करण्यात आली. जहाल गट विधिमंडळ प्रवेशासाठी उत्सुक असतानाच दि. १ ऑगस्ट १९२० रोजी टिळकांचे निधन झाले. परिणामी काँग्रेसची धुरा महात्मा गांधीकडे आली. काँग्रेसची सत्तासूत्रे महात्मा गांधीकडे आल्यामुळे हळूहळू या संघटनेत ब्राह्मणेतरांचे महत्त्व वाढीस लागले आणि कडव्या ब्राह्मणांचे महत्त्व कमी होऊ लागले. इकडे गांधीजीनी खिलापत चळवळीला पाठिंबा दिला. त्यासाठी २८ जुलै १९२० च्या खिलापत समितीच्या बैठकीला ते हजर राहिले. भारतीयांनी १ ऑगस्ट १९२० पासून सुरु होणाऱ्या अहिंसक असहकार चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. याबाबत विचारविनिमय करण्यासाठी ४ सप्टेंबर १९२० रोजी कोलकाता येथे काँग्रेसचे खास अधिवेशन आयोजित करण्यात आले. या अधिवेशनात बॅ. एम. आर. जयकर, दादासाहेब खापर्डे, न.चि. केळकर, डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे या टिळक समर्थकांनी गांधीच्या ठरावाला विरोध केला. तथापि हा ठराव १८२६ विरुद्ध ८८४ मतांनी पास झाला. या अधिवेशनाला टिळक समर्थक डॉ. केशव बळीराम हेडगेवार हे देखील उपस्थित होते. हा ठराव पारित होणे कट्टर हिंदुत्ववादी ब्राह्मण नेत्यांना अजिबात आवडले नसले तरी तूर्त शांत राहणे भाग पडले. काँग्रेस संघटनेवरील हिंदुत्ववादी ब्राह्मणांचे वर्चस्व दिवसेंदिवस कमी होऊ लागल्याने ते चिंतातूर झाले. ते योग्य संधीची वाट पाहत होते. कोलकाता ठरावावर शिक्कामोर्तब करण्यासाठी काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन डिसेंबर १९२० मध्ये नागपूरला भरले. अधिवेशन यशस्वी करण्यासाठी तरुणांचा सहभाग मिळविण्याच्या हेतुने डॉ. हेडगेवारांच्या नेतृत्वात भारत स्वयंसेवक मंडळ स्थापन करण्यात आले होते.

डॉ. हेडगेवारांनी या अधिवेशनात पूर्ण स्वराज्य ठराव पारित करण्यासाठी जोरदार मोहीम राबविली, मात्र ती यशस्वी ठरली नाही. या अधिवेशनात असहकार चळवळीच्या ठरावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. काँग्रेस संघटनेत गांधीच्या नेतृत्त्वात ब्राह्मणेतरांचे महत्त्व वाढू लागल्यामुळे जहाल ब्राह्मण नेते नाराज होणे स्वाभाविक होते. कोणत्याही परिस्थितीत विधिमंडळात प्रवेश करुन सत्तेची सूत्रे जहाल ब्राह्मण नेत्यांच्या हातात यावी यासाठी ते फ्फ़ारच आग्रही होते. डिसेंबर १९२२ च्या गया अधिवेशनात असा ठराव करण्याचा त्यांनी प्रयत्न केला, मात्र काँग्रेसने त्यास नकार दिला. त्यामुळे चिडलेल्या जहाल ब्राह्मण नेत्यांनी पुढाकार घेत देशबंधू चित्तरंजन दास व मोतीलाल नेहरू यांच्या नेतृत्वात १९२३ मध्ये स्वराज पक्ष स्थापन केला. यात बॅ. एम.आर. जयकर, एन.सी. केळकर, डॉ.बा.शि. मुंजे, माधव श्रीहरी अणे, बी.जी. खेर, ए.जी. मूळगावकर, एस.एन. दाभोळकर इत्यादी ब्राह्मण नेत्यांचा सक्रिय सहभाग होता.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना

इंग्रज जेव्हा केव्हा भारतीयांकडे सत्ता सोपवतील तेव्हा सत्तेवर ब्राह्मणांचे वर्चस्व असावे असे डावपेच काँग्रेसच्या स्थापनेपासूनच आखण्यात आले होते. त्यासाठी या संघटनेवर ब्राह्मणांचे प्रभुत्त्व कायम राहील याचे आटोकाट प्रयत्न करण्यात आले. सुरुवातीच्या कालखंडात या प्रयत्नांना यशही आले. मात्र जेव्हा काँग्रेसमधील ब्राह्मणांचे महत्त्व कमी झाले तेव्हा त्यांचा हिंदू राष्ट्रवाद जागृत झाला. हिंदुत्त्वाच्या नावाखाली सत्ता हस्तगत करु पाहणारा हा वर्ग मूठभर ब्राह्मण व त्यांना पुरक अशा समूहाचा गट होता. काँग्रेसमधील गांधीचे वाढते प्रस्थ त्यांना मान्य नव्हते, पण उघडपणे बोलण्याची हिंमत नव्हती. अगदी नाईलाजास्तव काही मंडळी या संघटनेत कार्यरत होती. गांधीच्या मदतीने का होईना सत्ता प्राप्त झाल्यास फायदा घेता यावा यासाठी हे लोक धडपडत होते. काही कट्टर हिंदुत्त्ववादी नेत्यांना गांधीचे मुस्लीम अनुनयाचे धोरण मान्य नसल्याने ते काँग्रेसमधून बाहेर पडले. डॉ. केशव बळीराम हेडगेवार हे अशा नेत्यांपैकी एक होते. काँग्रेसच्या बाहेर संघटना उभारुन त्या माध्यमातून सत्तेवर काबिज होता येईल का या प्रयत्नात ते होते. तसे डॉ. हेडगेवार काँग्रेसमध्ये कधीच रमले नाहीत. केवळ ब्राह्मणांचे हितसंबंध जपण्यासाठी ते या संघटनेत सक्रिय होते. टिळकांच्या निधनानंतर हा हेतू सफ्फ़ल होत नाही, हे लक्षात आल्यावर डॉ. हेडगेवार यांनी २७ सप्टेंबर १९२५ रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. हिंदुत्त्वाच्या गोंडस नावाखाली जनतेला संघटीत करायचे व ब्राह्मणांच्या हितासाठी या संघटनेचा वापर करुन घ्यायचा या एकमात्र हेतूने ही संघटना अस्तित्वात आली. ही संघटना राजकीय स्वरुपाची नसून सांस्कृतिक आहे, असा कितीही डांगोरा पीटण्यात आला तरी (अलीकडच्या लोकसभा व विधानसभा निवडनुकीतील सक्रिय सहभागावरुन) या संघटनेचा खरा हेतू आता उघड झाला आहे.

ज्या हिंदू राष्ट्राची संकल्पना आज मांडली जात आहे ती मूळात वैदिक व्यवस्थेशी निगडीत असून मनुस्मृतीच्या कायद्यांवर आधारीत आहे. यात जाती व्यवस्थेवर भर देण्यात आला आहे. समाजातील व्यक्तिचे स्थान तिच्या कर्तृत्वावर नव्हे तर जातीवर अवलंबून आहे. जातीच्या उतरंडित ब्राह्मण सर्वात वर तर शूद्र (बहुजन समाज) सर्वात खालच्या पायरीवर आहे. ज्या हिंदू राष्ट्र निर्मितीचा घोष सध्या सुरु आहे तसे हिंदू राष्ट्र अस्तित्वात आले तर राज्यकारभार कोणत्या कायद्यांनुसार चालविणार याबाबत हिंदुत्त्ववादी धुरीण सूचक मौन बाळगून आहेत. ज्या भगवदब गीतेने हिंसा, वर्णव्यवस्था (विषमता) व कर्मकांडांचे समर्थन केले, एवढेच नव्हे तर स्त्री वर्गाची पापयोनी म्हणून भर्त्सना केली (गीतेच्या अध्याय नऊ मधील ३२ व्या श्लोकात स्त्रियांना पापयोनी संबोधले आहे) त्या गीतेला देशाच्या राष्ट्रीय ग्रंथाचा दर्जा मिळावा अशी मागणी सरकारमधील जबाबदार व्यक्ति करीत आहेत, हा केवळ योगायोग नाही. यावरुन यांच्या ओठात एक व पोटात एक अशी अवस्था असतांना हिदुत्त्ववाद्यांवर भरवसा कसा करायचा ? हिंदू राष्ट्र झाले आणि मनूच्या कायद्यानुसार देशाचा राज्यकारभार चालविण्याचा बहुमताच्या आधारे निर्णय घेण्यात आला तर या देशातील बहुजन समाज व महिला वर्गाच्या प्रगतीची ग्वाही कशी देणार हा प्रश्न आहे.

यासाठी सध्याच्या राज्यघटनेनुसार हिंदू राष्ट्राचा कारभार चालेल की हिंदू कायद्यानुसार

(मनुस्मृतीचे कायदे) ? याबाबत हिंदू राष्ट्र पुरस्कर्त्यांनी आपली भूमिका निःसंदिग्धपणे जाहीर करणे आवश्यक आहे, जेणेकरुन याबाबतचा संभ्रम दूर होईल. पण हिंदुत्त्ववादी संघटना आपली भूमिका जाहीर करतील असे वाटत नाही. आजही देशातील साधनसंपत्तीवर ब्राह्मण आणि त्यांना पूरक समाजघटकांचा अधिकार आहे. उद्योग, व्यापार, नोकऱ्या इत्यादी अर्थार्जनाच्या क्षेत्रात याच वर्गाचे प्राबल्य आहे. स्वतःच्या फ्फ़ायद्यासाठी बहुजन समाजातील विविध जाती समूहांचा वापर करायचा मात्र धर्माच्या नावावर विविध भावनिक मुद्दे उकरुन काढत त्यांचे लक्ष अन्यत्र वळवत प्रगतीपासून कायम वंचित ठेवायचे अशी धूर्त खेळी आजही सुरु आहे. बहुजन समाजातील तथाकथित हिंदुना विकासाच्या ज्या संधी आज उपलब्ध आहेत त्या देशाच्या राज्यघटनेमुळे आहेत, हे विसरता कामा नये. या सर्व परिस्थितीचा विचार करता भारतीयांनी ठरवावे की त्यांना राज्यघटनेद्वारा संचालित आम जनतेच्या प्रगतीला हातभार लावणारा एकसंघ भारत हवा की जातीपातीच्या नावावर भेदभाव करणारे हिंदू राष्ट्र. (शेवट)

भि.म.कौसल
सेवानिवृत्त माहिती संचालक, नागपूर

त्या शाखा अभियंत्यावर कारवाई केव्हा होणार?

सिमेंट रस्त्यांच्या बांधकामाला अनियमिततेचा फटका: ग्रामपंचायत सदस्यांचा आरोप

सडक अर्जुनी: सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून तालुक्यात तयार करण्यात आलेले सिमेंट रस्त्याचे बांधकाम निकृष्ठ दर्जाचे असल्याची चर्चा तालुक्यात होत आहे.

जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभाग अर्जुनीच्या माध्यमातून मूलभूत सुविधा योजना, रस्ते व पूल दुरुस्ती परिक्षण कार्यक्रमांतर्गत, आमदार निधी, खासदार निधीच्या माध्यमातून विविध रस्ते बांधकाम, सुरक्षा भिंत, अंगणवाडी दुरुस्ती बांधकाम, निवासस्थान दुरुस्ती आदि कामे मोठ्या प्रमाणात केली जातात. सौंदड येथील देशी दारु दुकान समोरील रस्त्याचे काम करण्यात आले परंतु संबंधित ठेकेदाराने अंदाजपत्रकाप्रमाणे २ लाखांच्या खडिकरणाचे काम न करता सरळ सिमेंट काँक्रीटचे निकृष्ठ काम केल्याची तक्रार सौंदड ग्रामपंचायत सदस्य रोशन शिवणकर यांनी सडक अर्जुनीच्या बांधकाम विभागाला केली आहे. संबंधित शा अभियंत्याच्या बेजबाबदारपणामुळे सिमेंट रस्ता व विविध बांधकामाचे मोजमाप पुस्तिकीप्रमाणे कामे होत नसल्याची माहिती पुढे आली आहे. तालुक्यातील इतर सिमेंट कामांची चौकशी केल्यास अनेक सिमेंट बांधकामाचे पितळ उघड होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सडक अर्जुनी तालुक्यात सिमेंट रस्ता बांधकामाचे निकृष्ठ दर्जा असल्याची लेखी तक्रार ग्रामपंचायत सदस्य खजरी व सौंदड यांनी संबंधित बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना केली आहे. काही महिने लोटूनही शाखा अभियंता हेमंत निमजे यांच्यावर कुठलीच कारवाई झाली नाही. शाखा अभियंता निमजे यांच्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांची कृपादृष्टी असल्याची चर्चा होत आहे.

तर असे प्रकार होत राहतील

खजरी प्रकरणात ग्रामपंचायत सदस्य धम्मदीप सूर्यवंशी तर सौंदड येथील निकृष्ठ बांधकाम प्रकरण विषयी ग्रामपंचायत सदस्य रोशन शिवणकर यांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना लेखी तक्रार केली आहे. पण त्या तक्रारीकडे कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष दिले नाही. निकृष्ठ बोगस बांधकाम होत राहिल्यास शासनाचा पैसा लाटण्याचा प्रकार होत राहील, असे चित्र दिसत आहे.

सडक अर्जुनी तालुक्यातील मजुरांची भटकंती

कामाच्या शोधात शहराकडे धाव; रोजगार उभारणीची आवश्यकता

पांढरी : सडक अर्जुनी तालुक्यातील बहुतेक खेड्यातील मजूर व युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध नसल्याने त्यांना पोटाची खडगी भरण्यासाठी तसेच संसाराचा गाडा रेटण्यासाठी कामाच्या शोधात शहरांकडे पलायन करावे लागत आहे.

सडक अर्जुनी तालुक्याची निर्मिती १५ ऑगस्ट १९९२ ची आहे. या तालुक्यामध्ये १०८ गावांचा समावेश असून, एक लाख १५ हजार ५९४ इतकी लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार आहे. तालुक्याच्या निर्मीतीपासून तर आजपर्यंत औद्योगिक वसाहत व लघू उद्योग नसल्यामुळे मजुरांसह युवकांची मोठी गैरसोय होत आहे. उल्लेखनीय म्हणजे, निवडणुकीच्या तोंडावर सर्वच पक्षाचे राजकीय नेते रोजगारासंदर्भात मोठमोठी आश्वासने देत असतात. मात्र, एकदा निवडणूक संपली की, दिलेले आश्वासने हवेत विरत असतात. हा आजवरचा अनुभव आहे. या

तालुक्याने किंबहुना मतदारसंघाने आपला उमेदवार राज्याच्या मंत्रिमंडळातही दिला. अजूनही दमदार लोकप्रतिनिधी मतदारसंघाला मिळाले आहेत. मात्र, रोजगारासंबंधात ते चकार शब्द का बोलत नाहीत? हा प्रश्न आहे. परिसरातील नागरिकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. मोठ्या प्रमाणात शेतकरी शेती करीत असतात. पण निसर्गाच्या लहरीपणाचा फ्फ़टका शेतकऱ्यांना बसतो. शेतीचा हंगाम आटोपला की, मजुरांना दोन वेळच्या अन्नासाठी भटकंती करावीच लागते. शहरात जावून मिळेल ती कामे करावीच लागतात. रोजगार हमी योजनेची कामेही फारशी सुरू झाली नाहीत, हेदेखील भटकंतीचे कारण म्हणावे लागेल.

लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची गरज

सडक अर्जुनी तालुका निर्मितीपासूनच अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रात येत असून, मागील १५ वर्षांत दोनदा भाजप तर एकदा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा आमदार निवडून आले आहेत. २००९ ते २०१४ तसेच २०१४ ते २०१९ मध्ये राजकुमार बडोले भाजपकडून निवडून आले. या दरम्यान सामाजिक न्याय मंत्री पद त्यांनी भूषविले, तर २०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे मनोहरराव चंद्रिकापुरे आमदार झाले. भाजप तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या लोकप्रतिनिधींनी यासंदर्भात सरकारकडे आवाज उठविणे गरजेचे आहे.

आदर्श सार्वजनिक वाचनालय येथे जागतिक पुस्तक दिवस उत्साहात साजरा

गोरेगाव- तालुक्यातील मोहाडी येतील अ दर्जा प्राप्त ग्रंथालय आदर्श सार्वजनिक वाचनालय येथे २३ एप्रिलला जागतिक पुस्तक दिवस साजरा करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मोहाडी ग्रांम पंचायतचे सरपंच नरेंद्रकुमार चौरागडे होते.प्रमुख अतिथी संस्थेचे अध्यक्ष मदनलाल बघेले,उपाध्यक्ष जे.जे.पटले,संस्थापक सचिव ग्रंथमित्र वाय.डी.चौरागडे, ग्रांम पंचायत उपसरपंच मोहनलाल पटले,सदस्य वाय.एफ. पटले, हिरालाल महाजन, सामाजिक कार्यकर्ता प्रमानंद तिरेले, शिवराम मोहनकार, हिरामण पटले, तेजलाल कावडे माजी उपसरपंच श्रीराम पारधी, सुभाष चौरागडे, मुकेश येरखडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी सांगितले की जागतिक पुस्तक दिवस हा दरवर्षी २३ एप्रिलला साजरा केला जातो लोकांना पुस्तके वाचण्यासाठी आणि प्रकाशित करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. हा दिवस वाचनाचे सार, पुस्तकांचे महत्त्व आणि त्यांच्या कामावरील लेखकांचे अधिकार यांचा उत्साह साजरा करतो जागतिक पुस्तक दिवस हा एक विशेष दिवस आहे. जो पुस्तके,लेखक आणि बौद्धिक संपदा संरक्षणासाठी समर्पित आहे असे मान्यवरांनी सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन शुभम ठाकुर तर कार्यक्रमाचे आभार आशा चेचाने यांनी केले.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

नागणडोह गावाचा पुनर्वसनाचा प्रश्न कधी सुटणार?

व्यथा नागनडोह गावकऱ्यांची, हत्याच्या धुमाकूळामुळे चर्चेत आलेले नागणडोह हे गाव

केशोरी : स्वातंत्र्य झाल्यानंतर शासनाच्या ध्येय धोरणानुसार प्रत्येक गावात दळणवळणाची व्यवस्था, विजेची व्यवस्था, शिक्षणाची व्यव

त्या नराधमांना फाशीची शिक्षा द्या!

गोठानपार प्रकरण:विविध संघटनांची मागणी; बिरसा ब्रिगेडसह अनेक संघटनांचा पुढाकार

देवरी: तालुक्यातील चिचगड पोलीस स्टेशन हद्दीतील ककोडी क्षेत्रात असलेल्या ग्रामपंचायत गोठानपार येथे मानवी मन सून्न करुन टाकणारी घटना घडली. लग्नकार्यात आलेल्या १२ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण करुन तिच्यावर अत्याचार करुन हत्या केल्याची घटना याच गाव जंगल परिसरात २० एप्रिल रोजी उघडकीस आली होती. या घटनेमुळे देवरी तालुक्यासह अवघा गोंदिया जिल्हा हादरला. या प्रकरणातील आरोपींना त्वरित पकडून फाशीची शिक्षा द्यावी, या मागणीसाठी देवरी तालुक्यातील बिरसा ब्रिगेडसह अनेक संघटनांनी सोमवारी (दि.२२) राणी दुर्गावती चौक येथे एकत्र येऊन मोर्चा काढला. राणी दुर्गावती चौक ते तहसील कार्यालयापर्यंत पैदल मार्च करीत नराधमाला त्वरित अटक करा, आरोपीला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे, अशी मागणी केली. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना दिले.

गोठानपार येथे अर्जुनी मोरगाव तालुक्यातील वराचा विवाह सोहळा १९ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता पार पडला. याच लग्नात अल्पवयीन बारा वर्षीय मुलगी आली होती. दरम्यान, अंधाराचा फायदा घेऊन नराधमांनी त्या चिमुकलीचे अपहरण करुन गावाशेजारी असणाऱ्या जंगलात नेऊन तिच्यावर अत्याचार केला. यानंतर तिच्या डोक्यावर दगडाने वार करुन हत्या केली. या घटनेला तीन दिवसांचा कालावधी लोटला असून, या प्रकरणातील आरोपींना अद्यापही अटक करण्यात आलेली नाही. त्यामुळे आदिवासी समाजबांधवांमध्ये रोष व्यक्त होत आहे. पोलिसांच्या तपासकार्यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केला आहे. पोलिस विभागातर्फे आरोपींना पकडण्यासाठी पथक गठित केले असले तरी तीन दिवस लोटूनही आरोपी मोकाट फिरत आहेत. आरोपींचा शोध घेऊन त्यांचा फाशीची शिक्षा देण्यात यावी, या मागणीसाठी सोमवारी (दि.२२) अनेक संघटनांनी एकत्र येत तहसील कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन दिले. तसेच या घटनेचा निषेध नोंदविला. यावेळी मोठ्या संख्येने आदिवासी समाजबांधव उपस्थित होते.

नराधमाला त्वरित अटक करुन कठोर शिक्षा द्या, अन्यथा तीव्र आंदोलन करणार

देवरी: तालुक्यातील गोठानपार येथे अल्पवयीन मुलीचे अपहरण करुन तिची निर्दयपणे हत्या करण्यात आली. ही बाब मानवी मन सुन्न करणारी असून देवरी पंचायत समिती येथील पदाधिकारी व सदस्यांनी या घटनेचा जाहीर निषेध करीत सोमवारी (दि.२२) येथील उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन या प्रकरणातील नराधमाला त्वरित अटक करुन कठोर शिक्षा देण्याची मागणी केली. त्या नराधमावर त्वरित कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

या घटनेतील पीडित मुलीचा विनयभंग करुन तिची हत्या करण्यात आली. या घटनेला तीन दिवस लोटूनदेखील आरोपींचा शोध लागलेला नाही. त्यामुळे आदिवासी समाजामध्ये तीव्र असंतोष निर्माण होत आहे. याप्रकरणातील आरोपींना त्वरित अटक करुन हे प्रकरण जलद गती विशेष न्यायालयात चालवून पीडित कुटुंबाला न्याय देण्यात यावा, अन्यथा पंचायत समियी पदाधिकारी तसेच सदस्यांच्यावतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी दिला. शिष्टमंडळात पंचायत समितीच्या सभापती अंबिका बंजार, उपसभापती अनिल बिसेन व पंचायत समितीचे सर्व सदस्यांचा समावेश होता.

गोंदियातही निषेध

वीरांगणा राणी दुर्गावती आदिवासी सेवा समिती फुलचूर, आदिवासी विचार मंच, सेल्फ रिस्पेक्ट मुव्हमेंट, बिरसा फायटर गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमानाने गोंदिया येथे सोमवारी (दि.२२) देवरी तालुक्यातील गोठानपार येथील घटनेचा निषेध नोंदविण्यात आला. तसेच या प्रकरणातील आरोपींचा त्वरित शोध घेऊन आरोपींना कठोर शिक्षा देण्याची मागणी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनातून केली. शिष्टमंडळात हेमलता अहाके, मनीषा कुंभरे, शोभा कुसराम, मालती किन्नाके, लक्ष्मण कुंभरे, भावना उईके, सविता बेदरकर, सुनील डोंगरे, पंकज वासनिक, सविता उके, लता मडावी, गीता तुमडाम, वैशाली उके, एकता गणवीर यांचा समावेश होता.

नवीन उद्योग सोडाच, आहे ते सुद्धा बंद होण्याच्या मार्गावर

गेल्या पंधरा वर्षांत केवळ पोकळ घोषणाच: युवकांचे शहरांकडे स्थलांतरण

गोंदिया: धान उत्पादक आणि राइस मिल उद्योजकांचा जिल्हा म्हणून गोंदिया जिल्ह्याची ओळख आहे; पण ही ओळख आता हळूहळू पुसली जात आहे. केंद्र आणि राज्यात वजन असलेल्या नेत्यांचा हा जिल्हा असला तरी मागील १५ वर्षांत एकही मोठा नवीन उद्योग आला नाही. उलट ५० हजारांवर मजुरांना रोजगार देणारा महत्वपूर्ण राइस मिल उद्योगसुद्धा आता शासनाच्या धोरणामुळे डबघाईस आला आहे. एमआयडीसीत नवीन उद्योग स्थापन होऊन विकासाचा धूर निघण्याऐवजी शेकडो हेक्टर भुखंड अद्यापही रिकामे पडले आहेत. त्यामुळे नवीन उद्योग स्थापन होणे तर दुरच उलट आहे ते उद्योगसुद्धा बंद होण्याच्या मार्गावर आहे.

गोंदिया जिल्ह्यातील अर्थव्यवस्था ही पूर्णत: कृषीवर आधारित आहे. या जिल्ह्यात खरीप आणि रब्बी हंगाम मिळून ३ लाख हेक्टरवर धानाची लागवड केली जाते. यातून जवळपास ६५ लाख क्विंटल धानाचे उत्पादन होते. त्यामुळेच जिल्ह्यात २७० वर राइस मिल आहेत.

राइस मिलर्स शासकीय धानाची भरडाई करून सीएमआर तांदूळ शासनाकडे जमा करतात. यामुळे ५० हजारांवर मजुरांना रोजगार मिळतो. पण सध्या या उद्योगावर गेल्या सहा महिन्यांपासून शासनाच्या धोरणामुळे अवकळा आली आहे. त्यामुळे जिल्ह्याची ओळख असलेला हा उद्योगसुद्धा आता बंद होण्याच्या मार्गावर आहे. जिल्ह्यात सन २००९ मध्ये खा. प्रफुल्ल पटेल यांनी आपले वजन वापरुन अदानी विद्युत प्रकल्प आणला. यामुळे स्थानिकांना रोजगार मिळाला; पण यानंतर जिल्ह्यात एकही मोठ्या उद्योगाची पायभरणी झाली नाही. धानावर प्रक्रिया करणारे उद्योग स्थापन करण्याची सर्व प्रमुख राजकीय पक्षांनी केली; पण प्रत्यक्षात मात्र गेल्या १५ वर्षात त्याची मुहूर्तमेढ झाली नाही. त्यामुळे जिल्ह्यात दरवर्षी बेरोजगार युवकांची फौज निर्माण होत आहे. जिल्हा प्रशासनाने दिलेल्या आकडेवारीनुसार जिल्ह्यात ७२ हजारांवर सुशिक्षीत बेरोजगार आहेत. त्यांना जिल्ह्यात रोजगार उपलब्ध होत नसल्याने शहराच्या दिशेने धाव घ्यावी लागत आहे. गेल्या १५ वर्षांत झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत उद्योग स्थापन करुन रोजगार देण्याचे आश्वासन देण्यात आले. पण याची पूर्णता अद्यापही करण्यात आली नाही. सत्तधारी आणि विरोधक हे एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांचे बाण सोडण्यातच व्यस्त आहेत.

एमआयडीसीत भुखंड राखीव; पण उद्योग येईना

गोंदिया येथील एमआयडीसीत सध्या स्थितीत छोटे-मोठे असे ७० उद्योग आहेत. तर १३० एकरांचा भुखंड मागील दहा वर्षांपासून रिकामा पडला आहे. शासनाचे हा भूखंड उद्योगासाठी अनुकूल धोरण राबवून तो उद्योगांसाठी देण्याची गरज होती. पण प्रत्यक्षात तसे काहीच झाले नाही. त्यामुळे भुखंड राखीव उद्योग येईना अशी स्थिती आहे.

चार तालुक्यांत अद्याप एमआयडीसीच नाही

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सडक अर्जुनी, सालेकसा, अर्जुनी मोरगाव या तालुक्यात गेल्या २५ वर्षांत एमआयडीसी स्थापन झाली नाही. त्यामुळे चारही तालुक्यांना उद्योगाची प्रतीक्षा आहे. गोरेगाव येथील एमआयडीसी ८ ट्रॅक्टर ट्रॉली तयार करणारे उद्योग आहेत. तर देवरी येथील एमआयडीसीत केवळ एकच छोटा लोह प्रकल्प आहे. तिरोडा एमआयडीसीत अदानी विद्युत प्रकल्प वगळता दुसरा कोणता उद्योग नाही. त्यामुळे एमआयडीसीसाठी राखीव असलेले भुखंड केवळ कचरा वाढविण्यासाठी उपयोगी ठरत आहेत.

२ वर्षांनी सुनावणी तरी वकिलांची दांडी

नागपूर: विधानसभा निवडणुकीदरम्यान २०१९ ला साकोली येथे घडलेल्या घटनेबाबत पोलिसांत दाखल केलेला गुन्हा रद्द करण्यासाठी माजी मंत्री परिणय फुके यांनी उच्च न्यायालयात फौजदारी याचिका दाखल केली होती. यावर न्यायालयाने दोन वर्षांच्या खंडानंतर शुक्रवारी ठेवलेल्या सुनावणीत दोन्ही पक्षांकडून बाजू मांडणाऱ्या वकिलांचीन दांडी मारल्याने न्यायालयाने पुन्हा सुनावणी ४ आठवडे तहकूब केली. २ वर्षानंतर हे प्रकरण न्यायालयात सुनावणीसाठी आले असतानाही एकही वकील हजर होऊ शकलेला नाही. २३ जानेवारी २०२० ला झालेल्या गेल्या सुनावणीत न्यायालयाने प्रतिवादींना नोटीस बजावून उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले होते.

तक्रार राजकीय प्रेरित

साकोली विधानसभा जागेवर फुके आणि पटोले यांच्यात चुरशीची लढत असल्याचे तक्रारदाराने निवडणूक लढवण्यापासून रोखण्यासाठी आयपीसीच्या कलम १७१-ई,१४३,१४७,१४८,१४९,३२१ आणि ३२५ अंतर्गत तक्रार दाखल केली. वाहनातील काही लोक रोख रकमेचे पॅकेट्सचे वाटत होते. असा आरोप करण्यात आला. यावर आक्षेप घेतला असता आपल्याला धमकावत हल्लाही केल्याचा आरोप तक्रारदाराने केला. त्यावर फुके यांच्यावतीने दाखल फौजदारी याचिकेत पोलिसांनी दाखल केलेले एफआयआर त्यांची प्रतिमा मलिन करण्यासाठी रचलेली कथा आहे. त्यामुळे साकोली पोलिसांना दोषारोपपत्र दाखल न करण्याचे निर्देश देण्याची विनंतीही फुके यांनी न्यायालयाला केली होती.

सतत लांबतेय सुनावणी

जानेवारी २०२० ला नोटीस जारी केल्यानंतर प्रतिवादी पक्षाला उत्तर दाखल करण्यासाठी उच्च न्यायालयाने २ आठवड्यांचा वेळ दिला. १२ एप्रिल २०२२ ला उन्हाळी सुट्टी संपेपर्यंत सुनावणी पुढे ढकलण्यात आली. त्यानंतर आता हे प्रकरण २०२४ मध्ये सुनावणीसाठी आले. फिर्यादीनुसार काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आणि तत्कालीन विधानसभा अध्यक्ष नाना पटोले यांच्या नातेवाईकांनी फुके यांच्याविरोधात एफआयआर दाखल केला होता.

काळविटांसाठी कर्दनकाळ ठरतोय वनविभाग

गिधाडी येथील अधिवास संपुष्टात: ७० हेक्टरमधील कुरण संपविले

गोंदिया: पर्यावरण आणि वन्यजीवांच्या संवर्धनासाठी सर्वत्र व्यापक स्वरूपात उपाययोजना राबविल्या जात आहेत. परंतु गोरेगावच्या वनविभाग काळविटाचे अधिवास संपविण्यासाठी कुरण नष्ट करीत आहे. तालुक्यातील ग्राम चिल्हाटी ते गिधाडीदरम्यान असलेल्या ७५ हेक्टर जमिनीपैकी केवळ ५ हेक्टर जमीन कुरणासाठी ठेवण्यात आली आहे. उर्वरित जागेवर रोपटे लावल्याने काळविटांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, गोंदिया व गोरेगाव या तीन तालुक्यांतील जंगल परिसरात काळवीटाची संख्या १८० पेक्षा अधिक आहे. मानेगाव येथे काळवीट व चितळांची संख्या बऱ्याच प्रमाणात आहे. राज्यात अकोला, अहमदनगर, अमरावती, नागपूर व गोंदिया येथे काळविटांची संख्या बऱ्याच प्रमाणात आहे. येथील माळरानात काळविटांचा मोठ्या प्रमाणात अधिवास आहे. मात्र, जिल्ह्यातील माळरान नष्ट होत असल्याने मोठ्या संख्येत असलेल्या काळविटांचे अस्तित्व धोक्यात येत आहे. परिणामी, दिवसेंदिवस वन्यप्राण्यांची संख्या कमी होत आहे. सन २००४-०५ यावर्षी गोंदिया जिल्ह्यात काळविटांची संख्या २० ते २५ च्या दरम्यान होती. परंतु ती संख्या आता १५० ते १८० च्या घरात गेली आहे.

गोरेगाव तालुक्यातील गिधाडी येथील काळविटांचा अधिवास नष्ट करण्याचा प्रयत्न वनविभागाकडून होत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. गिधाडी येथील ७५ हेक्टर कुरण असलेल्या ७० हेक्टर जागेवर वनविभागाने रोपटे लावले आहेत. ४ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी वनविभागाने वन्यजीवांची पर्वा न करता रोपटे लावले आहे. ७५ हेक्टरपैकी फक्त ५ हेक्टर क्षेत्र या कुरणासाठी शिल्लक ठेवले आहे. परिणामी काळविटांचा अधिवास संपुष्टात येत असल्याने कुरणात राहणाऱ्या काळविटांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.



कसा ठेवणार वॉच?

काळवीट सोबतच कुरणावर वावरणाऱ्या लांडगे, चितळ, काळवीट, लांडगे, नीलगाय यासारखे प्राणी या जंगलात वावरतात. काळविटांचे निरीक्षण करण्यासाठी त्या ठिकाणी वॉच टॉवर तयार करण्यात आले.परंतु त्या वॉच टॉवरच्या समोरूनच रोपट्यांची लागवड करण्यात आल्याने त्या काळविटांवर वॉच कसे ठेवले जाईल हा प्रश्न आहे.

पाच हेक्टर जमीन कुरणासाठी

या ठिकाणी ५ हेक्टर जमीन कुरणासाठी ठेवण्यात आली आहे. आता १३,६५ हेक्टर जागेवर ३३ हजार ९०० रोपटे लावले आहेत. परंतु काळवीट ९४० हेक्टर जंगलातही संचार करु शकतात.

जिल्हाधिकाऱ्यांवर खंडपीठाची नाराजी

नागपूर: पर्यावरणाच्या असंतुलनामुळे मारस पक्षांचा अधिवास संकटात आला आहे. त्यावरुन सार्वजनिक हिताठी गोंदिया, चंद्रपूर आणि नागपूर जिल्हाधिकाऱ्यांनी सारस पक्ष्यांचे संवर्धन आणि अधिवास सुधारणासाठी पावले उचलण्यासंदर्भात शपथपत्र सादर करण्याचे आदेश देऊनही अद्याप उत्तर दाखल न केल्याबद्दल मुंबई उच्च न्यालयाच्या नागपूर खंडपीठाने नाराजी व्यक्त केली.

पर्यावरणाच्या असमतोलामुळे विदर्भातील जंगलातल्या सारक्ष पक्षांचा अधिवास नष्ट होत आहे. याबाबत समोर आलेल्या माहितीचा संदर्भ देत खंडपीठाने सार्वजनिक हितासाठी ही याचिका स्वीकारली. त्यानंतर खंडपीठाने गोंदिया, चंद्रपूर आणि नागपूर जिल्हाधिकाऱ्यांना सारस पक्ष्यांचे संवर्धन आणि अधिवास सुधारणासाठी पावले उचलण्याचे आदेश देत शपथपत्र सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यावर उद्यप कोणीही उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अतिरिक्त सरकारी वकील डी.पी.ठाकरे असमर्थ ठरत आहेत. भंडारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर वगळता इतर जिल्हाधिकाऱ्यांनी खंडपीठाच्या आदेशाला प्रतिसाद दिलेला नाही.

लोकसभा निवडणुकीसाठी संवेदनशील

सस्टेनिंग एन्व्हायन्मेंट ॲंड वाइल्डलाइफ असेंबलिजने संवर्धनाची योजना तयार केली होती. त्यात भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर जिल्ह्यांचा सारस पक्षांच्या संवर्धनासाठी समावेश झाला आहे. या जिल्ह्यांतून वाहणाऱ्या नद्यांच्या काठावरील वाळू संकुल सारस पक्ष्यांसाठी उपयुक्त आहे. त्यामुळे सारस संवर्धनासाठी योग्य प्रयत्न केले तर त्यांना नक्कीच वाचवता येईल. अशाप्रकारे, स्थलांतरीत पक्ष्यांना शेतात, धान्याची कोठारे, जंगल नसलेल्या भागात आणि इतर भागात जाण्यापासून वाचवता येते. त्यामुळे खंडपीठाने सारस पक्ष्यांच्या संवर्धनासाठी पाणथळ जागा चिन्हांकित करण्यासंदर्भात कोणती पावले उचलली? ही माहिती ३० एप्रिलपर्यंत देण्याचे आदेश दिले. सध्या जिल्हाधिकारी लोकसभा निवडणुकीच्या तयारीत असल्याने खंडपीठाने ही अखेरची संधी सरकारला दिली.



शेवटची संधी, अन्यथा अवमान कारवाई

सुनावणी दरम्यान खंडपीठाने स्पष्ट केले की, सारस पक्षी संवर्धनाबाबत खंडपीठाने यापुर्वी १५ जानेवारी २०२० ला या संदर्भात आदेश जारी केले आहेत. तरीही जिल्हाधिकाऱ्यांनी शपथपत्र सादर न करणे हे त्यांचे अपयश स्पष्ट करणे आहे. त्यामुळे आता कारवही गरजेची झाली आहे. अशा परिस्थितीत जिल्हाधिकाऱ्यांना शपथपत्रासाठी शेवटची संधी दिली जात आहे. आता कोणत्याही परिस्थितीत ३० एप्रिलपर्यंत शपथपत्र रेकॉर्डवर न आल्यास अवमानाची कारवाई केली जाईल.

बटरी दाळीत सिन्थेटीक फ्फुड कलर टारटाझीन असल्याचे स्पष्ट

गोंदिया: अन्न व औषध प्रशासन, गोंदिया कार्यालयास प्राप्त झालेल्या तक्रारीवरुन गुप्त माहितीच्या आधारे १९ ऑक्टोबर २०२३ रोजी अन्न सुरक्षा अधिकारी शितल देशपांडे यांनी गोंदिया शहरातील मेसर्स प्रभुदास अट्टलमल, मालवीया वार्ड, बाजपेई चौक, गोंदिया येथे कार्यवाही करुन रंगीत बटरी दाळीचा नमूना घेऊन उर्वरीत साठा ४१८ किलो, किंमत ३० हजार ९६ रुपये जप्त केला होता. सदर दाळीस सिन्थेटीक फ्फुड कलर टारटाझीन असल्याचे तपासाअंती स्पष्ट झालेले आहे.

विमान प्रवाशांच्या संख्येत वाढ

27.94 लाख प्रवाशांनी केला प्रवास वित्तीय वर्ष 2023-24 मध्ये

25.65 लाख प्रवासी होते वित्तीय वर्ष 2022-23 मध्ये

2.28 लाख प्रवासी वाढले

2 वित्तीय वर्षांची उड्डाणे व प्रवाशांवर एक नजर

महिना	प्रवासी	उड्डाण	महिना	प्रवासी	उड्डाण
एप्रिल-23	2,69,655	1,588	एप्रिल-22	1,98,826	1,636
मे-23	2,49,121	1,928	मे-22	2,17,808	1,706
जून-23	2,43,346	1,705	जून-22	1,97,877	1,717
जुलै-23	2,30,119	1,799	जुलै-22	1,68,745	1,610
ऑगस्ट-23	2,30,595	1,747	ऑगस्ट-22	1,81,183	1,565
सप्टेंबर-23	2,21,932	1,746	सप्टेंबर-22	1,74,185	1,432
ऑक्टोबर-23	2,21,259	1,892	ऑक्टोबर-22	1,98,967	1,552
नोव्हेंबर-23	2,18,192	1,898	नोव्हेंबर-22	2,26,456	1,596
डिसेंबर-23	2,40,851	2,023	डिसेंबर-22	2,37,702	1,805
जानेवारी-24	2,27,122	1,886	जानेवारी-23	2,44,234	1,830
फेब्रुवारी-24	2,12,161	1,873	फेब्रुवारी-23	2,54,167	1,873
मार्च-24	2,29,721	1,880	मार्च-23	2,65,005	2,118

नागपूर: शहरातून विमानाने प्रवास करणाऱ्यांची संख्या वर्षानुवर्षे वाढत आहे. तर २०२३-२४ हे आर्थिक वर्ष नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सर्वात खास ठरले आहे. १ एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत नागपुरातून सुमारे २२,००० उड्डाणे चालवण्यात आली, तर यातून २७.९४ लाखांहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला. यात १,१०,७०६ परदेशी प्रवासी तर २६,८३,३६८ देशांतर्गत प्रवासी होते.

२०२२-२३ या आर्थिक वर्षात २५.६५ लाखांहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला होता. त्यापैकी २४,९९,६४३ देशांतर्गत प्रवासी आणि ६५,५१२ परदेशी प्रवासी होते. गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत यावेळी ११.८ टक्के म्हणजेच २,२८,९१९ प्रवाशांची वाढ झाली आहे. जी नागपुरसाठी आतापर्यंतची सर्वोच्च संख्या आहे.

१० टक्के पेक्षा अधिक फ्लाइट्समध्ये वाढ

गेल्या आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये २०,४४० फ्लाइट्सने उड्डाण भरली होती. तर या आर्थिक वर्षात १० टक्के पेक्षा अधिक वाढ झाली आहे. जानेवारी-२३ मध्ये फ्लाइट्सची संख्या १८३० होती तर यावेळी जानेवारी-२४ मध्ये फ्लाइट्सची संख्या ५६ ने वाढून १८८६ झाली. परंतु प्रवाशांच्या बाबतीत जानेवारी-२३ मध्ये प्रवाशांची संख्या २.४४ लाखांच्या वर होती. जी यावेळी ७ टक्के कमी होऊन जानेवारी-२४ मध्ये २.२७ लाख प्रवाशांपेक्षा थोडी जास्त झाली. त्याचप्रमाणे फेब्रुवारी-२३ मध्ये प्रवाशांची संख्या २.५४ लाखांपेक्षा जास्त होती. परंतु फेब्रुवारी-२४ मध्ये १६.५ टक्के घसरणीसह प्रवाशांची संख्या २.१२ लाखांपेक्षा किचिंत जास्त होती. गेल्या वर्षी मार्च-२३ मध्ये २,६५,००५ प्रवासी संख्या होती तर यावर्षी मार्च-२४ मध्ये केवळ २,२९,७२१ प्रवासी राहिले. जानेवारी-२३ मध्ये परदेशी प्रवासी ७,०७० होते, ते यंदा जानेवारी-२४ मध्ये ९,२५३ झाले. फेब्रुवारी-२३ मध्ये परदेशी प्रवासी संख्या ६,६५४ होती, तर यावर्षी फेब्रुवारी-२४ मध्ये परदेशी प्रवाशांची संख्या ९,२०७ झाली आहे.

विमान प्रवासी क्रेझ वाढतीवर

मिळालेल्या माहितीनुसार प्रवाशांच्या वाढत्या संख्येत सर्वात मोठी भूमिका इथून वाढणारा व्यवसाय, पर्यटन आणि राजकीय हालचालींचा आहे. नागपूर हे देशाचे केंद्र असल्याने विमान वाहतूक वाढत आहे. आतन अनेक मार्गावर थेट विमानसेवा सुरु झाल्यास प्रवाशांची संख्या अनेक पटींनी वाढू शकते. सध्या नागपूरहून दिल्ली, मुंबई,पुणे, बंगळूर, हैदराबाद, कोलकाता, इंदूर, अहमदाबाद, लखनौ, गोवा, चेन्नई, नाशिक, बेळगाव, अजमेर याशिवाय शाजिह आणि दोहाला आंतरराष्ट्रीय उड्डाणे आहेत. सध्या दिल्ली, मुंबई, पुणे आणि बंगळूरसाठी फ्लाइटची जास्तीत-जास्त मुव्हमेंट आहे. सध्या विशेष लोकांपासून ते सामान्य लोकांपर्यंत विमान प्रवासाबाबत क्रेझ पाहायला मिळत आहे.

७,६०० हून अधिक प्रवासी दररोज करतात प्रवास

इतर शहरांच्या तुलनेत नागपूरातून विमान प्रवासी वाढत आहेत. त्याचबरोबर येत्या महिनाभरात उन्हाळा आणि लग्न सभारंभ लक्षात घेता प्रवाशांच्या वाढीचा वेग आणखी वाढण्याची शक्यता आहे. सध्या येथून ६२ हून अधिक विमाने उड्डाण भरत आहेत. नागपूरचा विकास होत असताना विमानतळाची व्यस्तातही वाढत आहे. मात्र त्याच्या विस्तारीकरणाचे काम रखडले आहे. त्याचा विस्तार झाल्यास येथून प्रवाशांच्या संख्येत लक्षणीय वाढ होऊ शकते. सध्या येथून दररोज ७,६०० हून अधिक प्रवासी प्रवास करीत आहेत.

२३ वर्षांत २९६ शेतकरी आत्महत्या, तब्बल १२७ प्रकरणे ठरविली मदतीसाठी अपात्र

गोंदिया: सततची नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे विदर्भात शेतकरी आत्महत्येचा ग्राफ दिवसेंदिवस वाढत आहे. आधीच शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आता प्रशासकीय धोरणांचा फटका सहन करावा लागत आहे. जिल्ह्यात मागील २३ वर्षांत २९६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. त्यापैकी तब्बल १२७ शेतकऱ्यांची आत्महत्या मदतीस अपात्र ठरविण्यात आली आहे. नापिकी,कर्जाला कंटाळून केलेल्या आत्महत्यांनाही शासन आत्महत्या मानत नाही ही शोकांतिका आहे.

जिल्ह्यात २००१ ते २०२३ या वर्षांत २९६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. दरवर्षी शेतकरी आत्महत्यांमध्ये वाढ होत असल्याची आकडेवारी समोर येत आहे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत न देता आत्महत्या ही शासनाच्या धोरणानुसार अपात्र ठरत असल्याचे दाखवून त्यासाठी विविध कारणे दर्शविली जात आहेत. सततची नापिकी, दुष्काळ यामुळे शेती तोट्याची होत चालली आहे. त्यामुळे शेती करणाऱ्या शेतकऱ्याला कर्ज घ्यावे लागते. परंतु त्या कर्जाची परतफेड करण्यास असमर्थ आणि यातून आलेल्या नैराश्यापोटी शेतकरी आत्महत्या करतो. त्या शेतकऱ्यांनी बँकेकडून कर्ज घेतले नाही म्हणून त्या शेतकरी आत्महत्येला मदतीपासून नाकारण्यात येत आहे. उसनवारीवर घेतलेल्या पैशांकडे शासन लक्ष देत नसून शेतकऱ्यांची आत्महत्या अपात्र ठरवित आहे.

जिल्ह्यातील वर्षनिहाय शेतकरी आत्महत्या आकडेवारी

सन	आत्महत्या	पात्र	अपात्र				
२००१	००	००	००	२०१३	०६	०४	०२
२००२	०१	०१	००	२०१४	१९	०९	०८
२००३	०१	०१	००	२०१५	३१	१०	२१
२००४	०६	०२	०४	२०१६	३१	१०	२१
२००५	०६	०६	००	२०१७	१८	०६	१२
२००६	२२	१७	०५	२०१८	१७	०५	१२
२००७	१९	१७	०२	२०१९	१०	०५	०५
२००८	१८	०९	०९	२०२०	०८	०५	०३
२००९	१२	०७	०५	२०२१	१६	१३	०३
२०१०	२२	१६	०६	२०२२	०७	०५	०२
२०११	१३	१०	०३	२०२३	०५	०५	००
२०१२	१०	०६	०४	२०२४	०२	००	००

१ कोटी ६९ लाख रुपयांचे वाटप

आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या वारसदारांना शासनाकडून एक लाख रुपये सानुग्रह मदत देण्यात येते. परंतु आत्महत्या ही शासनाच्या निकषानुसार असावी अशी थट्टाच जणू शासनाने चालविली आहे. एखाद्याच्या घरचा आधार निघून जातो. आणि ती आत्महत्या ही शेतकरी आत्महत्या आहे किंवा नाही याची केविलवाणी तपासणी प्रशासन करते. काहींना सानुग्रह मदतीसाठी पात्र तर काहींना अपात्र ठरविते. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना अपात्र ठरवून शेतकऱ्यांची जणू सरकार थट्टाच करीत आहे. एक लाखासाठी कुणी स्वत:हून जीव देणार नाही हे सरकारने आतातरी समजावे. जिल्ह्यात २३ वर्षांतील १६९ शेतकऱ्यांची आत्महत्या पात्र ठरवून एक कोटी ६९ लाख रुपये देण्यात आले.

भंडारा-गोंदिया लोकसभा निवडणूकीत ६७ टक्के मतदान

विधानसभा मतदार संघ	एकूण मतदान				एकूण मतदान				टक्केवारी			
	पुरुष	महिला	इतर	एकूण	पुरुष	महिला	इतर	एकूण	पुरुष	महिला	इतर	एकूण
(६०) तुमसर	१५३०४२	१५०१५२	०१	३०३१९५	१०६१६७	९८५७०	०१	२०४७३८	६९.३७	६५.६५	१००	६७.५३
(६१) भंडारा	१८४२०५	१८५७४४	०४	३६९९५३	१२६३५२	११८०४७	०२	२४४४०१	६८.५९	६३.५५	५०	६६.०६
(६२) साकोली	१६२२८०	१६१४९५	००	३२३७७५	११७९७२	११२९४६	००	२३०९१८	७२.७०	६९.९४	००	७१.३२
(६३) अर्जुनी मोर.	१२७०८९	१२६८५३	००	२५३९४२	९११९९	८८७६५	००	१७९९६४	७१.७६	६९.९७	००	७०.८७
(६४) तिरोडा	१३००८३	१३४०१६	००	२६४०९९	८३८६९	८२०६१	००	१६५९३०	६४.४७	६१.२३	००	६२.८३
(६५) गोंदिया	१५२८७१	१५९३४४	०९	३१२२२४	१००४९८	९८५०४	०३	१९९००५	६५.७४	६१.८२	३३.३३	६३.७४
एकूण	९०९५७०	९१७६०४	१४	१८२७१८८	६२६०५७	५९८८९३	०६	१२२४९५६	६८.८३	६५.२७	४२.८६	६७.०४

मतदाराची टक्केवारी घसरली

सन २०१९ मध्ये झालेल्या भंडारा-गोंदिया लोकसभा निवडणूकीत १८ लाख ०८ हजार ७३४ मतदारांपैकी १२ लाख ३४ हजार ८९६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. तर २०२४ च्या लोकसभा निवडणूकीत १८ लाख २७ हजार १८८ मतदारांपैकी १२ लाख २४ हजार ९५६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मागील लोकसभा निवडणूकीपेक्षा या निवडणूकीत १८ हजार ४५४ मतदार संख्या वाढली असताना मात्र सन २०१९ च्या लोकसभा निवडणूकीत झालेल्या मतदानापेक्षा या निवडणूकीत ९ हजार ९४० मतदारांचे मतदान कमी झाले. या लोकसभा निवडणूकीत मतदानाची टक्केवारी घसरल्याने चिंतेची बाब ठरत आहे.

६,०२,२३२ मतदारांची मतदानाकडे पाठ

निवडणूक आयोगाच्या यादीनुसार, भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात १८,२७,१८८ मतदार असल्याची नोंद आहे. मात्र, दोन्ही जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघ मिळून फक्त १२,२४,९५६ मतदारांनीच मतदान केले. त्यामुळे ६,०२,२३२ मतदारांनी या राष्ट्रीय कर्तव्यात सहभाग घेतला नसल्याचे आकडेवारीवरुन दिसत आहे.

तिरोडा मतदारसंघात सर्वांत कमी मतदान

तिरोडा विधानसभा मतदारसंघामध्ये २,६४,०९९ मतदारांची नोंद आहे. मात्र येथे फक्त १,६५,९३० मतदारांनी मतदान केले. येथे ९८,१६९ मतदारांनी मतदान केले नाही. त्यापाठोपाठ गोंदिया विधानसभा मतदारसंघातही मतदानाची टक्केवारी कमी आहे. येथे ६३,७४ टक्के मतदान झाले. मागील २०१९ मधील लोकसभेच्या निवडणुकीपेक्षा यावेळी तेथील मतदारांची टक्केवारी घटली आहे.

यावेळी घट अधिक

मागील पाच वर्षाचा विचार करता या निवडणुकीतील मतदानात घट अधिक आहे. सर्वाधिक मतदान २०१४ च्या निवडणुकीत ७२.२१ टक्के झाले होते. त्यावेळी असणाऱ्या मोदी लाटेत काँग्रेस आणि विरोधक मोठ्या प्रमाणावर माघारले होते. २००४ आणि या वेळच्या निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी सारखी असली, तरी किंचित घट मात्र आहे.

नवमतदार, महिलांमध्ये उत्साह

या निवडणुकीत नवमतदान आणि महिलांमध्ये मतदानाप्रति प्रचंड उत्साह दिसून आला. जिल्ह्यातील जवळपास सर्वच मतदान केंद्रावर नवमतदान व महिलांनी मतदान करण्यासाठी गर्दी केली होती.



सायंकाळी उशिरापर्यंत झाले मतदान

शुक्रवारी (दि.१९) जिल्ह्यात ४१.१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. दुपारी ऊन अधिक असल्याने जिल्ह्यातील अनेक मतदान केंद्रावर दुपारनंतर मतदान करण्यासाठी मतदारांची गर्दी वाढली होती. मतदानाची वेळ सकाळी ७ ते सायंकाळी ६ अशी असली तरी मतदान केंद्राच्या आत अनेक मतदार मतदान करण्यासाठी रांगेत असल्याने अनेक मतदान केंद्रावर सायंकाळी उशिरापर्यंत मतदान सुरु होते.

ईव्हीएम मशीन बंदच्या २५ वर तक्रारी

शुक्रवारी सकाळी ७ वाजता मतदानाची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर जिल्ह्यातील २५ मतदान केंद्रावर ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशीन बंद, बिघाडल्याच्या घटना घडल्या. तर काही राखीव मशीन असल्याने त्वरित बंद पडलेल्या ईव्हीएम मशीन बदलून मतदान प्रक्रिया सुरळीत करण्यात आली. गोरेगाव तालुक्यातील तिल्ली मोहगाव येथील मतदान केंद्रावरील व्हीव्हीपॅट मशीनमध्ये बिघाड झाल्याने या केंद्रावरील मतदान दोन तास ठप्प झाले होते. दरम्यान, दुसरी मशीन बदलून याठिकाणी सकाळी ११.१५ वाजता मतदान सुरळीत सुरु करण्यात आले. जिल्हा निवडणूक विभागाने चारही मतदारसंघातून ईव्हीएम बंदच्या २५ वर तक्रारी प्राप्त झाल्याचे सांगत त्यांचे त्वरित निराकरण केल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले.

आतापर्यंत सर्वच अपक्षांची अनामत रक्कम जप्त

भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातील सन २००९ पासूनच्या निवडणुकांतील आकडेवारी बघितली असता या तिन्ही निवडणुकांत एकूण ३४ अपक्ष उमेदवारांनी आपले भाग्य आजमावले आहे. यात त्यांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. मात्र, सन २००९ मधील निवडणुकीत अपक्ष उमेदवार नाना पटोले त्याला अपवाद ठरले आहेत.

नेत्यांनी केले मतदान

लोकप्रतिनिधींनीसुद्धा सकाळीच मतदान केंद्रावर मतदानासाठी पोहोचत मतदानाचा हक्क बजावून मतदारांचा उत्साह वाढवला. खा. प्रफुल्ल पटेल यांनी कुटुंबियांसह स्थानिक नमाद महाविद्यालयातील मतदान केंद्रावर पोहोचत मतदानाचा हक्क बजावला. आ. विनोद अग्रवाल यांनी न.प. शाळेतील मतदान केंद्रावर, आ.सहषराम कोरोटे यांनी पत्नीसह देवरी येथील जि.प. शाळेतील मतदान केंद्रावर, आ.विजय रहांगडाले यांनी खमारी येथील मतदान केंद्रावर, आ.मनोहर चंद्रीकापुरे यांनी सडक अर्जुनी येथील मतदान केंद्रावर, माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी सडक अर्जुनी येथील मतदान केंद्रावर, माजी आ.राजेंद्र जैन यांनी पत्नी मुलासह गोंदिया येथील एनएमडी महाविद्यालयातील मतदान केंद्रावर पोहोचत मतदानाचा हक्क बजावला.

गोंदिया:- भंडारा-गोंदिया लोकसभा निवडणूकीच्या पहिल्या टप्प्यातील भंडारा-गोंदिया लोकसभा निवडणूकीकरीता १९ एप्रिल रोजी जिल्ह्यात सर्वत्र मतदान शांततेत पार पडले. या निवडणूकीत ६७ टक्के मतदान झाले. २ हजार १३३ मतदान केंद्रावरून १२ लाख २४ हजार ९५६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. १९ एप्रिल रोजी पार पडलेल्या मतदान प्रक्रियेत सर्वाधिक मतदान साकोली विधानसभा क्षेत्रात ७१.३२ टक्के झाला. दि.४ जून २०२४ रोजी कडेकोट पोलीस बंदोबस्तात मतमोजनी होणार असून मतदार संघातील जनतेच्या नजरा लागलेल्या आहेत. मतदार

संघातील ६७ टक्के मतदारांनी १८ उमेदवारांचे भाग्य ईव्हीएम बंद केले आहे.

भंडारा-गोंदिया लोकसभा निवडणूकीकरीता यावेळी १८ उमेदवार रिंगनात होते. निवडणूकीच्या पहिल्या टप्प्यातील भंडारा-गोंदिया लोकसभा निवडणूकीकरीता १९ एप्रिल रोजी मतदान शांततेत पार पडले. सकाळपासूनच मतदान केंद्रावर नागरिकांच्या मतदानाच्या रांगा दिसून येत होत्या. उष्णतेच्या प्रहारीत दुपारी मतदानाचा वेग काही प्रमाणात मंदावला होता. सायंकाळी मात्र मतदानाला वेग येवून मतदान केंद्रावर मतदारांची गर्दी दिसून आली. काही मतदान केंद्रावर ईव्हीएम बिघाडामुळे तसेच मशीनच्या संथ गतीमुळे मतदारांची गैरसोय झाली. तर ईव्हीएम बिघाडामुळे काहीकाळ मतदान प्रक्रिया बाधित झाली होती. तर काही मतदार जिवंत असताना त्यांच्या नावापुढे मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आल्याने गोंधळ उडाला. निवडणुक कार्याकरीता अतिरिक्त घेतलेल्या २० टक्के कर्मचारी वर्गाला आधी पोस्टल मतदान मंजूर केल्याने त्यांना बुथवर मतदान करताच आले नाही. तर निवडणुक आयोगाने पोस्टलही नाकारल्याने त्यांना मतदानापासून वंचित राहण्याची वेळ गोंदिया जिल्ह्यात आली.

१२ लाख २४ हजार ९५६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला

त्यामुळे काही केंद्रावर रात्री उशिरापर्यंत मतदान पार पडले. यामध्ये तुमसर विधानसभा क्षेत्रात ६७.५३ टक्के, भंडारा ६६.०६, साकोली ७१.३२, अर्जुनी मोर ७०.८७, तिरोडा ६५.८३ तर गोंदिया विधानसभा क्षेत्रात ६३.७४ टक्के मतदान झाले. भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघातील १८ लाख २७ हजार १८८ मतदारांपैकी ६ लाख २६ हजार ०५७ पुरूष व ५ लाख ९८ हजार ८९३ स्त्री व इतर ६ अशा १२ लाख २४ हजार ९५६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदान शांततेत व निर्भिडपणे पार पडावे याकरीता पोलीस प्रशासनाकडून सर्वच मतदान केंद्रावर कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. जिल्ह्यात अनुचित घटना घडू नये. मतदान शांततेत पार पडवा याकरीता वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पोलीस प्रशासनातील अधिकारी लक्ष ठेवून होते. या लोकसभा निवडणूकीत महिला नवमतदार तसेच दिव्यांग मतदारात उत्साह दिसून आला.

नक्षलवाद्यांचा विरोध झुगारुन देवरीत मतदान

आमगाव मतदारसंघात ६४.६० टक्के मतदान

गोंदिया: आमगाव विधानसभा मतदारसंघ गडचिरोली-चिमुर लोकसभा मतदारसंघात मोडतो. या मतदारसंघात खरया अर्थाने महायुतीकडून भाजपचे अशोक नेते आणि महाआघाडीकडून काँग्रेसचे नामदेव किरसान यांच्यात अत्यंत अटीतटीची लढत असल्याचे प्रचारातून दिसून आले. या मतदारसंघात आमगाव, देवरी आणि सालेकसा या तालुक्यांचा समावेश आहे.

आमगाव-देवरी विधानसभा मतदारसंघात ७८ मतदान केंद्रे संवेदनशील आहेत. या मतदारसंघात १ लाख ३१ हजार ८० पुरुष, १ लाख ३० हजार ८६७ महिला अशा एकूण २ लाख ६१ हजार ९४८ मतदारांचा समावेश होतो.

या मतदार संघातील देवरी आणि सालेकसा हे तालुके आदिवासी आणि नक्षलरित्या अत्यंत संवेदनशील म्हणून ओळखले जातात. त्यामुळे पोलिसांनी या मतदारसंघातील मतदान केंद्रावरील सुरक्षेसाठी अत्यंत कडक बंदोबस्त लावला. नक्षल्यांनी मतदानाचा विरोध करण्याचे आवाहन केले होते. मात्र प्रशासनाची जनजागृती आणि मतदारांत लोकशाहीचा सर्वात मोठा सण साजरा करण्याचा उत्साह असल्यामुळे आमगाव विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रावर मोठा उत्साह दिसून आला. देवरी तालुक्यातील नक्षलरित्या अत्यंत संवेदनशील आणि जंगलव्याप्त भागांतील मतदान केंद्रांवर सकाळपासूनच महिला-पुरुषांनी मतदानासाठी मोठी गर्दी केली होती. दुपारी उन्ह असल्यामुळे सकाळीच मतदारांच्या मतदानासाठी रांगा लागल्याचे दिसून आले.

पोलिस आणि निवडणूक विभागाच्या अत्यंत शिस्तबद्ध नियोजनामुळे आमगाव विधानसभा मतदारसंघात कोणतीही अनुचित घटना घडली नाही. तर मतदारांना आकर्षित करण्यासाठी मतदान केंद्रावर उत्कृष्ट सजावट करण्यात आली होती. पाणी, उपचार, पंखे, सेल्फी पॉईंट, पिंक सेंटर अशा सुविधा तयार करण्यात आल्या. परिणामी मतदारांनीही जास्तीत-जास्त मतदान करण्यावर भर दिला. आमगाव मतदारसंघात मतदानाची वेळ सकाळी ७ ते दुपारी ३ वाजेपर्यंत होती. ३ वाजेपर्यंत मतदारसंघातील तीनही तालुक्यात सरासरी ६४.६० टक्के मतदान झाले.

नववधूवरांचे आधी कर्तव्य मतदानालाच प्राधान्य

नवरदेव पोहोचली मतदान केंद्रावर, आधी पाठवणी मग मतदान

गोंदिया: लोकशाही प्रधान देशात प्रत्येक नागरिकांचे मत हे महत्वपूर्ण आहे. शिवाय नागरिकांच्या एका मताने देश, राज्य आणि आपल्या मतदारसंघाचे नेतृत्व ठरत असते. त्यामुळे ही बाब आता मतदारांनासुद्धा कळून चुकली आहे. त्यामुळे कामात किती व्यस्त असले तरी अनेकजण मतदानाचे कर्तव्य आवर्जुन बाजावत आहे. लग्नाच्या धामधुमीत आधी कर्तव्य मतदानाचा मग विवाह असे म्हणत शुक्रवारी (दि.१९) मतदान केंद्रावर पोहोचत मतदानाचा हक्क बजावला. त्यामुळे नववधूवरांचे आधी कर्तव्य मतदानाला असे चित्र दिसून आले.

जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव येथील स्नेहल अरुण शुक्ला हिचा विवाह कौस्तुभ अवस्थी यांच्याशी गुरुवारी अर्जुनी मोरगाव येथे पार पडला. शुक्रवारी (दि.१९) तिची पाठवणी होती. पण स्नेहाने पतीसह पाठवणीपुर्वी अर्जुनी येथील मतदान केंद्रावर पोहोचत मतदानाचा हक्क बजावला.

तर केशोरी बुथ क्रमांक ३०६ वर गणेश धनीराम कुंभरे या नवरदेवाने आधी मतदानाचा हक्क बजावून नंतर वरात काढलई, तर तिरोडा तालुक्यातील धादरी येथील जयश्री मधुकर पटले व आशिष तुलसीदास बिसेन यांचा विवाह गुरुवारी रात्री धादरी येथे पार पडला. यानंतर या वधूवरांनी शुक्रवारी सकाळी धारदी येथील मतदार केंद्रावर पोहोचत मतदानाचा हक्क बजावला. गोंदिया तालुक्यातील खातिया येथील मतदान केंद्रावर नवरदेव थेट वरातीतून मतदान केंद्रावर पोहोचत मतदान केले. त्यामुळे नववधूवरांचे आधी कर्तव्य मतदानालाच असे चित्र होते.

लोकसभा निवडणूकीतून एसटी डेपोला ३५ लाख

आगाराच्या तिजोरीत येणार ३५ लाख रुपये: गोंदियाच्या ६०, तर तिरोडाच्या ३८ बसेस

गोंदिया: लोकसभा निवडणुकीत ड्युटी लागलेल्या मतदान केंद्र अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक साहित्यासह केंद्रावर सोडून त्यांना परत आणण्यासाठी जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यात ९८ बसेसचा राज्य रस्ते परिवहन महामंडळासोबत करार केला होता. त्यानुसार गोंदिया व तिरोडा आगारांना एकूण ३५ लाख २८ रुपये भाड्यापोटी मिळणार आहे. यावरुन राज्य रस्ते परिवहन महामंडळाला लोकसभा निवडणूक चांगलीच पावली असल्याचे म्हणणे वावगे ठरणार नाही.

कोणत्याही निवडणुकीत सर्वात महत्वाचे कार्य असते ते मतदानाचे. कारण मतदानाचा निकाल यावरुन लागतो व यामुळेच मतदानप्रक्रिया अत्यंत खबरदारीने घ्यावी लागते. पुर्वी बॅलेट पेपरद्वारे मतदान केले जात होते. मात्र आता बॅलेटची जागा ईव्हीएमने घेतली आहे असे असतानाही जिल्ह्यात यंदा १८ उमेदवार रिंगणात होते. त्यामुळे प्रत्येक मतदान केंद्रावर दोन ईव्हीएम लावावे लागले.

अशात जिल्ह्याती १२८८ मतदान केंद्र व त्यावर ड्युटी असलेले अधिकारी-कर्मचारी तसेच ईव्हीएम व अन्य साहित्यंना मतदान केंद्रावर सोडण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून राज्य रस्ते परिवहन महामंडळासोबत करार केला होत. यामध्ये निवडणुकीसाठी गोंदिया आगारातून ६० तर तिरोडा आगारातून ३८ अशाप्रकारे एकूण ९८ बसेस जिल्हा प्रशासनाला देण्यात आल्या होत्या. या बसेसद्वारे १८ एप्रिल रोजी अधिकारी-कर्मचारी व निवडणूक साहित्य मतदान केंद्रावर सोडण्यात आले. तसेच १९ एप्रिल रोजी सायंकाळी मतदान आटोपल्यनंतर मतदान केंद्र अधिकारी-कर्मचारी व साहित्य नियोजित स्थळी सोडून बसेस रात्री आगारात परतल्या.

या दोन दिवसांच्या कामासाठी महामंडळाकडून १८ हजार रुपये प्रतिदिवस या दराने बसेस पुरविण्यात आल्या होत्या. यामुळे दोन दिवसांचे दोन्ही आगारांना एकूण ३५ लाख २८ हजार रुपये मिळणार आहेत. यात गोंदिया आगाराला २१ लाख ६० हजार, तर तिरोडा आगाराला १३ लाख ६८ हजार रुपये मिळणार आहेत.

साकोली आगारातील बसेसही होत्या ड्युटीवर

भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीत गोंदिया व तिरोडा आगारातील बसेस सोबतच भंडारा जिल्ह्यातील साकोली आगारातील बसेसही ड्युटीवर होत्या. साकोली आगाराने तेथूनच बसेन पाठविल्या होत्या. तर त्यांच्या सात बसेस गोंदिया आगाराला देण्यात आल्या होत्या. तिरोडा आगारातील ३८ बसेन ड्युटीवर असल्या तरी त्यातील ९ बसेस गोंदिया आगाराला देण्यात आल्या होत्या.

बसेसने येथे सोडले कर्मचाऱ्यांना

निवडणुकीत गोंदिया आगारातील ६० बसेस बुक होत्या. तर तिरोडा आगाराच्या ९ व साकोली आगाराच्या ७ बसेस मागवून अशाप्रकारे एकूण ७६ बसेन ड्युटीवर होत्या. यातील ३६ बसेस गोंदिया तालुक्यात, १५ बसेस आमगाव तालुक्यात, ११ बसेस देवरी तालुक्यात व ६ बसेस सालेकसा तालुक्यात पाठविण्यात आल्या होत्या. तिरोडा आगारातील ३८ बसेन बुक होत्यात व त्यातील २० बसेस तिरोडा तालुक्यात, ९ बसेस गोरेगाव तालुक्यात तर ९ बसेस गोंदिया आगाराला देण्यात आल्या होत्या.

आसलपाणी येथे दारू पिऊन मतदान केंद्रावर मतदान कर्मचाऱ्यांचा धिंगाणा

गोंदिया: लोकसभा निवडणुकीत दारू पिऊन कर्तव्य बजावणाऱ्या केंद्राध्यक्ष व त्याच्या दोन सहकाऱ्यांना तिरोड्याच्या उपविभागीय अधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी पूजा गायकवाड यांनी ताबडतोब कर्तव्यातून हटविले. त्यांच्या जागी राखीव कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली. हा प्रकार शुक्रवारी गोरेगाव तालुक्याच्या आसलपाणी येथील मतदान क्रमांक २२७ वर घडला होता.

भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्राची निवडणूक चांगल्या पद्धतीने पार पडावी, याकरिता जिल्हा प्रशासनाने जिवाचा आटापिटा केला. मात्र, कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांनी सकाळीच दारू ढोसून गालबोट लावले. त्यामुळे संताप व्यक्त केला जात आहे.

गोरेगाव तालुक्यातील आसलपाणी या गावात सकाळी सात वाजता मतदान प्रक्रियेला सुरवात झाली. आसलपाणी येथे मतदान क्रमांक २२७ मध्ये कर्तव्यावर असलेले मतदान केंद्राध्यक्ष आणि त्याचे दोन सहकारी कर्मचारी सकाळीच दारू पिऊन असल्याचे आढळून आले. ही बाब तिरोड्याच्या उपविभागीय अधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी पूजा गायकवाड यांना कळली. त्यांनी ताबडतोब दखल घेऊन मद्यपी केंद्राध्यक्ष व त्याच्या सहकारी कर्मचाऱ्यांना कर्तव्यातून दूर केले. त्यांच्या जागी राखीव कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली. या घटनेमुळे प्रशासन आणि मतदारांमध्ये चांगलीच खळबळ उडाली होती.